महाराष्ट्र विधानसभा
तिसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २४, १९३७ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ७९

नांदेड येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) वसतिगृहाच्या इमारतीची झालेली दूरावस्था

(१) * u३४६८७ uu**श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा)** I: I सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) नांदेड येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) वसतिगृहांची इमारत मोडकळीस आली असून ती विद्यार्थ्यांना राहण्यास योग्यय नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विविध सुविधांपासून वंचित रहावे लागत असून गत तीन वर्षांपासून प्राचार्याकडून प्रशासनाकडे यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येत असूनही निधीअभावी या वसतिगृहांना सुविधा पुरविण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वसतिगृहाला निधी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्ततकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३), (४) व (५) वसतिगृहाच्या किरकोळ दुरुस्त्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत असून, अंदाजपत्रक प्राप्त झाल्यावर जिल्हा नियोजन समितीकडे मागणी करण्यात येईल.

पुणे जिल्ह्यातील पी.एम.पी.च्या बसचे ब्रेक डाऊनचे प्रमाण वाढले असल्याबाबत

u

(२) * u२८९३३ uuश्री.भिमराव तापकीर (खडकवासला) ा: ा सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पी.एम.पी.च्या सुमारे १३० बसेसना उत्पादक कंपनी सुटे भाग वेळेवर देत नसल्याने ब्रेक डाऊनचे प्रमाण वाढले असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच कालावधीत एकाच दिवशी सुमारे ६३ बसेस् बंद ठेवण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पी एम पीच्या एकूण बसेस पैकी सुमारे २८० बसेस कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावरर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी ीशासनाने उत्पादक कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.

uuuu उत्पादक कंपनीकडे सुट्टेभागांचा केलेल्या मागणीचा पुरवठा वेळेत प्राप्त न झाल्याने ब्रेक डाऊनचे प्रमाण वाढले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) नाही, तथापि, दिनांक ४.८.२०१५ रोजी एकूण ६३ बसेस मार्गावर संचलन करत असताना निरनिराळ्या कारणास्तव ब्रेक डाऊन झाल्या होत्या. सदरच्या बसेस तात्काळ दुरुस्ती करुन त्याच दिवशी मार्गावर पाठविण्यात आल्या होत्या.

(३) परिवहन महामंडळाच्या बस ताफ्यापैकी सुमारे १० ते १५ टक्के बसेस दैनंदिन देखभाल व दुरुस्ती तसेच विविध कारणास्तव बंद असतात तथापि, सदर प्रमाण कमी करण्याबाबत महामंडळ प्रयत्नशील आहे.

(४) उत्पादन कंपनीने पुरवठा केला असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण झ ाला नाही.

(५) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

पाचगणी (जि.सातारा) येथे आराध्या इंटरनॅशनल हॉस्टेलमधील ६ वर्षाच्या विद्यार्थ्याला बाथरुममध्ये डांबून मारहाण केल्याबाबत

u

(३) * u३०११९ uuश्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पाचगणी (जि.सातारा) येथे आराध्या इंटरनॅशनल हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या ६

वर्षाच्या विद्यार्थ्याला बाथरुममध्ये डांबून मारहाण केल्यासंदर्भात मुंबईतील चेंबूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर विद्यार्थ्याला बेदम मारहाण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) फिर्यादी विद्यार्थ्याने चेंबूर पोलीस ठाणे, मुंबई येथे दिलेल्या सविस्तर खबरीवरुन गु.र.नं.०/२०१५ भादंविक. ३४२, ३२४, ३४ बाल न्या.अधि. सन-२००० चे कलम २३ प्रमाणे दि.१०.८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाची कागदपत्रे पांचगणी पोलीस ठाणेत प्राप्त झाल्यानंतर गुरनं.२७/२०१५ भादंवि क.३४२, ३२४,३४ बाल न्या.अधि.सन २००० चे कलम २३ प्रमाणे दि.११.८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.` आरोपींना अटक करण्यात आली असून, मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.`सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली झालेला गैरव्यवहार

(४) * **u३५६०७ uuश्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील बहुतांश रस्त्यांची खड्यामुळे दुरवस्था झाली असून रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली रस्त्याची कामे न करताच संबंधित ठेकेदारांनी १५ कोटींचा गैरव्यवहार केल्याचे दिनांकक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले,` हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ते तातडीने दुरुस्तीसाठी नागरिकांनी आंदोलने केली असल्याचेही निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची कामे झाली नसतानाही देयके निघालेली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाईई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?uu

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) उल्हासनगर शहरातील रस्ते दुरुस्तीच्या कामामध्ये गैरव्यवहार झालेला नाही. तथापि, दिनांक ०५.०९.२०१५ रोजीच्या लोकमत या दैनिकात uकामे न होताच १५ कोटी गेले कुठे` अशा आशयाची बातमी आलेली होती.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
uuuuu उल्हासनगर शहरातील ४ प्रभागांमध्ये सन २०१५-१६ या वर्षात एकूण

रुपये ३.८८ कोटी रकमेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा प्रसिध्द करुन व त्यास समितीची मान्यता घेऊन कामे सुरु केली आहेत. त्यापैकी आतापर्यंत सुमारे २.५ कोटी रकमेची कामे पूर्ण झालेली असून अद्याप ठेकेदारास देयके अदा केलेली नाहीत.

(४) पूर्ण झालेल्या कामात वापरलेल्या बांधकाम साहित्याचे नमुने कामाचा दर्जा तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले असून या कामांचा गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर तसेच त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण झाल्यानंतरच देयके अदा करण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे लाच स्वीकारताना उपनिबंधकासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत

u

(५) * u३४२११ uuडॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले)`:` सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथे मागासवर्गीय औद्योगिक संस्थेला जमिन विक्रीची परवानगी देण्यासाठी १० हजारांची लाच स्वीकारतांना उपनिबंधकासह तिघांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) शिवशाहू मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, नवे पारगांव, ता.हातकणंगणे, जि. कोल्हापूर या संस्थेच्या नांवे असलेली तळसंदे, ता.हातकणंगले येथील २० गुंठे जमीन विक्री करण्याकरिता उप निबंधक, सहकार संस्था, हातकणंगले यांच्या परवानगी करिता सादर केलेला प्रस्ताव मंजूरीसाठी आरोपी लोकसेवक सुनिल सुधारक सिंगतकर यांनी तक्रारदार श्री.वैभव शंकर कांबळे यांचेकडे प्रथम अरुण शंकर कुंभार, सहकारी अधिकारी यांच्या मार्फतीने तक्रारदार यांच्याकडे रु. २५,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. तद्नंतर लोकसेवक सुनिल सुधाकर सिंगतकर यांनी तडजोडीअंती रु.१०,०००/- एवढ्या रक्कमेची मागणी करुन ती संजय मोठाजी थैल, सहायक सहकारी अधिकारी यांनी स्विकारुन खाजगी इसम राजेंद्र महादेव चव्हाण, चालक, इचलकरंजी अर्बन को.ऑप बँक लि.इचलकरंजी यांच्याकडे दिली.

uuuu या प्रकरणी आरोपी लोकसेवक १) सुनिल सुधारक सिंगतकर, उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर, २) संजय मोठाजी थैल, सहायक सहकारी अधिकारी, उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,

जि.कोल्हापूर, ३) अरुण शंकर कुंभार, सहकारी अधिकारी ४) खाजगी इसम राजेंद्र महादेव चव्हाण, चालक, इचलकरंजी अर्बन को.ऑप बँक लि. इचलकरंजी यांचेविरुध्द हातकणंगले पोलीस स्टेशन येथे` भाग-६, गु.र.क्र. ५३/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, ८, १०, १२, १३(१)(ड) व १३(२) अन्वये दि.३०.०८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
uuuuu आरोपी लोकसेवक सुनिल सुधारक सिंगतकर, उप निंबधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर, संजय मोठाजी थैल, सहायक सहकारी अधिकारी, उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर, अरुण शंकर कुंभार, सहकारी अधिकारी यांना ा सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने निलंबित करण्यात आले आहे.` तसेच खाजगी इसम राजेंद्र महादेव चव्हाण हे चालक/शिपाई म्हणून इचलकरंजी अर्बन को.ऑप बॅक लि.इचलकरंजी येथे नेमणूकीस असल्याने सदर बॅकेने त्याची दि. ०४.०९.२०१५ पासून त्यांची सेवा समाप्त केली आहे.

शासनाच्या सेवा योजन कार्यालयात नोंदणी केलेल्या उमेदवारांची नोंदणी रद्द केल्याबाबत

(६) * **u३४९७७ uuश्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल शिंदे (वरळी)ी:ी** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) शासनाच्या सेवायोजन कार्यालयात सन १९९९ ते २०१२ या कालावधीत नोंदणी केलेल्या दिड कोटीहून अधिक उमेदवारांची नोंदणी रद्द केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००२ मध्ये सर्वाधिक ११, लाख ७५ हजार ५९४ उमेदवारांची कार्ड रद्द केली असून त्या खालोखाल २००६ मध्ये ९,९५,५६९ कार्ड रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात उमेद्वारांची नोंदणी रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सुशिक्षित बेकारांना काम देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडून केंव्हाही नोकरीचे ठरविलेले उद्दिष्ट पार करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.
(२) नोकरीस लागल्यामुळे सन २००२ व सन २००६ मध्ये अनुक्रमे ९५४२ व १४७७१ उमेदवारांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.` तसेच संबंधीत उमेदवारांनी नोंदणीचे नुतणीकरण न केल्याने सन २००२ व सन २००६ मध्ये अनुक्रमे ८२९९२४ व ९८४६१६ उमेदवारांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.

गेल्या ५ वर्षात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाच्या नोंदणीपटावर असलेल्या उमेदवारांचा तपशील खालील प्रमाणे आहे

वर्ष	नोकरीस लागलेले उमेदवार
२०११	१९१०२२
२०१२	१३४२७१
२०१३	११४६५८
२०१४	८४७०७
२०१५ (ऑक्टोबर, २०१५ अखेर)	४६९३८

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना लाच घेताना पकडल्याबाबत

u

(७) * u२८८६५ uu**श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शिरीष यादव यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास पकडले, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २००५ मध्ये पुणे महानगरपालिकेतील टीडीआर घोटाळा प्रकरणी श्री. यादव यांना दिनांक १ जुलै, २००७ रोजी निलंबित करण्यात आले असूनही त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणांचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, दोषी विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) होय. पुणे महानगरपालिका हद्दीतील कोथरुड येथील सर्वे नं. १४३ व १४४ या जमिनीवरील टीडीआर गैरव्यवहार प्रकरणी श्री. शिरीष यादव यांचेविरुध्द गुन्हा दाखल झाल्याने त्यांना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या दि. ०५.०३.२०११ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तद्नंतर त्यांना शासन आदेश दि. १८.०७.२०११ अन्वये त्यांच्या विरुध्दच्या फौजदारी खटल्याच्या निर्णयाच्या अधिन राहून शासन सेवेत पुन:स्थापित

करण्यात आले`आहे.

(३) व (४) तक्रारदार श्री. योगेश वसंत सावंत, रा. सिटी स.नं.१६७, घोरपडे पेठ, पुणे यांचे लोहियानगर येथील प्लॉटची मोजणी करुन त्याचे क्षेत्र निश्चित करण्याचे काम व त्यामध्ये बेकायदेशीर बांधकाम केलेले प्रार्थनास्थळ कायदेशीर न करण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पूर्वी अपात्र ठरविलेल्या झोपडपट्टी धारकांनी पात्रतेसाठी दिलेले अर्ज मंजूर करुन त्यांना पात्र करण्याचे काम करुन देण्यासाठी लोकसेवक श्री. शिरीष यादव यांनी रु. १०,००,०००/- एवढया रक्कमेची मागणी करुन त्यापैकी रु. ५,००,०००/- एवढी लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

या प्रकरणी त्यांचेविरुध्द चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३११७/२०१५. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३(१)(ड) व १३(२) अन्वये दि. ०२.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांच्या दि. ०३.१०.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याच्या तपास सुरु आहे.

त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिका हद्दीतील कोथरुड येथील सर्वे नं १४३ व १४४ या जमिनीवरील टीडीआर गैरव्यवहार प्रकरणी त्यांचेविरुध्द डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ५७९/२००५, भा.दं.वि. कलम ४२०,४६७, ४६८,४७१,१२०(ब), १०९, २०१ सह लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३(१) (ड) व १३(२) अन्वये दि. १०.१०.२००५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये त्यांचेविरुध्द मा. न्यायालयात अभियोग दाखल करण्यास शासन आदेश दि. १६.१२.२००८ अन्वये सक्षम प्राधिकारी यांनी मंजूरी दिली असून विशेष न्यायालय, पुणे येथे दि. ०७.०९.२००९ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर खटला सद्य:स्थितीत न्यायप्रविष्टआहे.

---

u

औरंगाबाद शहरासाठी रस्त्यांच्या दुरुस्ती व बांधकामांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता

u

(८) * **u२८५५६ uuश्री.छगन भुजबळ (येवला) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१)१ औरंगाबाद शहरातील रस्त्यांच्या दुरुस्ती व बांधकामांसाठी शासनाने दिलेल्या रुपये ८४ कोटी निधीचे काम ठराविक कंत्राटदारास देण्याकरिता फेर निविदा न काढता ८ टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,यययययययय

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये

वा त्या दरम्यान औरंगाबाद महापालिका प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय, u u u u u u u u u u
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) औरंगाबाद शहरातील रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी रु.२०.८९ कोटींची ईई निविदा काढण्यात आली होती. त्यामध्ये` प्राप्त निविदाकारांमधून मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर या निविदनाकराची निविदा त्यांच्याशी वाटाघाटी करुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ टक्के जादा दराने स्वीकृत करण्यात आली.
(२) या अनुषंगाने राज्य शासनाकडे तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे.
(३) सदरहू निविदा प्रक्रियेमध्ये काही अनियमीतता झाली आहे किंवा कसे याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयातील औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका क्रमांक ८९/२०१५ दाखल झाली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

चक्करबर्डी (जि.धुळे) परिसरातील पाणी पुरवठा योजनेतंर्गत जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(९) * u३०५८५ uu**श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी)**ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) चक्करबर्डी (जि.धुळे) परिसरातील केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत १३६ कोटी रुपयांचे` पाणी पुरवठा योजनेच्या जलकुंभाचे काम करण्यात येत आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर पाणी पुरवठा योजनेतील आर्थिक गैरव्यवहारर लपविण्यासाठी सदर जलकुंभाची मोडतोड करण्यात आली तसेचच कंत्राटदारालाही देयके अदा करण्यात आली याबाबत चौकशी करावी अशी मागणी नगरसेवकांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवासी जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणीी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी

योजनेतंर्गत रु. १३६.३६ कोटी किंमतीची धुळे शहराची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून उक्त योजनेमध्ये चक्करबडी जलकुंभ येथे नविन जलकुंभ बांधणे या कामाचा समावेश आहे.

(२) सदरचे काम नित्कृष्ट दर्जाचे झाल्याचे व सदर पाणी पुरवठा योजनेतील आर्थिक गैरव्यवहार लपविण्यासाठी जलकुंभाची मोडतोड केली असल्याबाबत व तसेच कंत्राटदाराला देयक अदा केलेबाबत चौकशी करावी या आशयाची मागणी धुळे महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी दि. १५ सप्टेंबर, २०१५ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी धुळे यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे. हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी धुळे यांना त्वरीत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून याबाबत जिल्हाधिकारी धुळे यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

चंदगड (जि.कोल्हापूर) येथील पोलिसांनी सीमा भागात घरफोडया करणा-या दोघांना अटक केल्याबाबत

(१०) * u२९६६५ uu**श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)** ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील पोलिसांनी राज्यात तसेच कनार्टक व गोवा सीमा भागात मोठया प्रमाणात घरफोडया करणा-या दोघांना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ३६ लाख ४३ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व गडहिंग्लज तालुक्यामध्ये १४ घरफोडया करणाऱ्या ३ आरोपीना चंदगड पोलीस ठाणे जि. कोल्हापूर पोलीसांनी ताब्यात घेवून त्यांचेकडून रु. ३१,८४,२५४ किंमतीचा मुद्देमाल रोख रकमेसह हस्तगत करण्यात आला आहे.

(२) सदरहू आरोपीविरुध्द चंदगड पोलीस ठाणे येथे १० गुन्हे व नेसरी पोलीस ठाणे येथे ४ गुन्हे असे एकूण १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

शासनाने आयटीआयच्या शिक्षण व परिक्षा शुल्कात वाढ करण्याचा घेतलेला निर्णय

(११) * **u३००९० uuश्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यातील ८७१ शासकीय व खाजगी आयटीआयचे शिक्षणशुल्क १८० रुपयांवरुन ५ हजार रुपये करण्यात आल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने आयटीआयच्या परिक्षा शुल्कात ५० रुपयांवरुन थेट ६५० रुपये एवढी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शुल्कवाढीमुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना आयटीआय चे शिक्षण घेणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने अवास्तव शुल्क वाढ रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सुधारीत प्रशिक्षण शुल्कापैकी प्रशिक्षणार्थ्यांकडून आकारण्यात आलेले रु.१०००/- संस्था विकास शुल्क शासनाने रद्द केले असून सदर शुल्क प्रशिक्षणार्थ्यांना परत करावयाची कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येत आहे.

uuuu तथापि, परिक्षा शुल्कामध्ये रुपये ५५०/- इतकी वाढ करण्यात आली असून सदर वाढ रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी उभारलेले भुयारी मार्ग तसेच उड्डाणपूल वापराविना असल्याबाबत

(१२) * **u३५५६२ uuश्री.योगेश टिळेकर (हडपसर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी उभारलेले तब्बल २१ भुयारी मार्ग आणि ९ उड्डाणपूल देखभाल दुरुस्ती आणि चुकीच्या नियोजनामुळे वापराविना असल्याचे माहे ऑक्टो २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्तत भुयारी मार्गग तसेच पादचारी उड्डाणपुलांचा वापर होत

नसल्याने``देखभाल दुरुस्ती करणे, विद्युत व्यवस्था करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३)३असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.
uuuuu पुणे शहरातील २१ पादचारी भुयारी मार्गांपैकी २० पादचारी भुयारी मार्ग व ९ पादचारी उड्उ ाणपूलांपैकी ७ पादचारी उड्डाण पुल (FOB) वापरात आहेत.
uuuu २१ पादचारी भुयारी मार्गांपैकी जंगली महाराज रस्त्यावरील मॉडर्न हायस्कुल चौकातील एक पादचारी भुयारी मार्ग बंद आहे. तथापि, सदर भुयारी मार्ग सुस्थितीत असून या रस्त्यावरील वाहतुक एकेरी केल्याने तसेच भूयारी मार्गात दुकाने बांधून त्याचा वापर वाढविणे, स्वच्छता व सुरक्षितता करणे याकरीता टेंडर प्रक्रिया सुरु करुन लवकरच नागरिकांसाठी खुला करण्यात येणार आहे.
uuuu ९ पादचारी उड्डाणपूलांपैकी खडकी रेल्वे स्टेशन व नवा पूल ते मनपाभवन पादचारी पूल या दोन पादचारी उड्डाणपूलांची कामे अंतिम टप्प्यात असून मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(२) पुणे शहरातील भुयारी मार्ग/पादचारी पूलांच्या योग्य वापर होत आहे.` तथापि, पादचारी भुयारीमार्ग व पादचारी पुलांची किरकोळ स्वरुपाची देखभाल दुरुस्ती व विद्युत व्यवस्था इत्यादी कामे करणे आवश्यक असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३) भुयारी मार्ग/ पादचारी पुलांची महापालिकास्तरावर तपासणी केली असून त्यामध्ये किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती उदा. टाईल्स, रेलींग, फुटपाथ डिव्हार्डर, लिकेज, उद्वाहक, विजेची उपकरणे व रंगरंगोटी इत्यादी कामे करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

उल्हासनगर महापालिका एल.बी.टी. विभागात
२०० कोटींचा झालेला गैरव्यवहार

u
(१३) * u३२०१७ uuश्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील

पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण)ण:ण सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) उल्हासनगर महापालिका स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) विभागातीलल जवळपास २०० कोटीचा गैरव्यवहार झाल्यासंदर्भात ३० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी व १६ कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनाची कार्यवाही करणेत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर महापालिकेला एल.बी.टी. पासून मिळणारे दरमहा उत्पन्नातून कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांचेवर पोलीस कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागमधील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे स्थानिक संस्था कराच्या वसुलीमध्ये घट झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने १६ कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(२) विभागीय चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

u

कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेले २७ गावांमध्ये पाणी टंचाई असल्याबाबत

(१४) * **u३८०४६ uuश्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून आधी वगळलेल्या २७ गावांचा माहे जून,२०१५ महिन्यापासून पुन्हा महापालिकेत समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू २७ गावांचा विकासासाठी कोणतेही विशेष धोरण ठरविण्यात आलेले नसल्याने मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास उपरोक्त २७ गावांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांसाठी १ हजार ८९ कोटीची तरतूद करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निधी कोणकोणत्या पायाभूत सुविधांवर खर्च होणार आहे व निधीपैकी माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर किती निधी खर्च करण्यात आला वा अद्यापही किती निधी खर्च होणे बाकी आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शासन अधिसूचना, दि. १४/०५/२०१५ अन्वये कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात दि. ०१ जून, २०१५ पासून २७ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. २६/०८/२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीत पारीत करण्यात आलेल्या ठरावानुसार ठाणे जिल्ह्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामधील कल्याण तालुक्यातील १० गावांमधील अंदाजे १०८९ हेक्टर क्षेत्राच्या प्रस्तावित ग्रोथ सेंटरच्या विकासाबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने सदरर प्रस्तावित ग्रोथ सेंटरमधील पायाभूत सोयी-सुविधांच्या उपलब्धतेकरीता अपेक्षित असलेल्या अंदाजे रु.१०८९ कोटी एवढ्या खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६४ मधील तरतूदीनुसार नगर नियोजन योजनेच्या माध्यमातून करावयाच्या विकास कामांमध्ये रस्ते, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, पाणी पुरवठा व सांडपाणी व्यवस्था, ट्रक टर्मिनल, फायर स्टेशन, पार्किंग लॉट्स, उद्याने, खेळाची मैदाने इत्यादीचा समावेश होतो.

uuuu सद्यस्थितीत सदर ग्रोथ सेंटरच्या निये ाजनाकरीता आवश्यक असणारी सर्वेक्षणे, प्रकल्प अहवाल इत्यादीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

मुंबईत बोरीवलीहून चर्चगेटकडे येणाऱ्या लोकल मधील तरुणीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याबाबत

(१५) * **u३०९०९ uuश्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)ी:ी** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईत बोरीवलीहून चर्चगेटकडे येणाऱ्या लोकल मधील तरुणीवर दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी रात्री ११ च्या सुमारास एका तरुणाने ग्रँट रोड रेल्वे स्टेशनमध्ये डब्यात घुसून बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटना घडत असताना सदर तरुणीने चर्नीरोड, मरीनलाईन्स स्टेशनवर मदतीसाठी आवाज दिला असता पोलीस अथवा आरपीएफचा कोणीही जवान प्लॅटफॉर्मवर हजर नव्हता, ा हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित पोलीस अथवा आरपीएफच्या जवानावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना लक्षात घेता सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारीची कोणती

उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) नाही.
(३) पिडीत तरुणीने सांगितलेल्या हकीकतीवरुन पोलीस उपनिरीक्षक यांनी फिर्याद दिली त्याची नोंद गु.र.नं.४७/१५ भा.द.वि. कलम ३५४, सह कलम-१५०ई, १५२, भा.रे.का अन्वये दिनांक ०७.०८.२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासाअंती सदर गुन्ह्यात रेल्वे कायदा १६२ व १४५ व अशी वाढीव कलमे लावण्यात आली आहे. आरोपीस दिनांक १०.०८.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून तपास महिला पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत केला असून न्यायालयात दोषारोष पत्र सादर करण्यात आले आहे.
uuuuu याप्रकरणी रेल्वे पोलीस कर्मचारी अथवा आरपीएफ जवान यांची कोणतीही कसुरी आढळलेली नाही.
uuuuu लोकल ट्रेनच्या महिला राखीव डब्यात सुरक्षेकामी मध्ये परिमंडळात २३८ पोलीस कर्मचारी व ११९ होमगार्ड तसेच पश्चिम परिमंडळात १८६ पोलीस कर्मचारी व ९५ होमगार्ड नेमले जातात. एका ट्रेनच्या २ हत्यारबंद पोलीस कर्मचारी व ९५ होमगार्ड नेमले जाता. एका ट्रेनच्या २ महिला राखीव डब्यात प्रत्येक डब्यात १ असे २ हत्यारबंद पोलीस कर्मचारी व तीसऱ्या महिला राखीव डब्यात १ होमगार्ड नेमला जातो अशा रितीने दररोज रात्री ०९.३० ते सकाळी ०६.३० वाजेपर्यत महिला प्रवाशांच्या सुरक्षेकामी एस्कॉटिंग नेमली जाते.

दागिन्यांची व इतर वस्तूंची चोरी करणाऱ्या प्रवासींवर कारवाईसाठी स्वतंत्र निर्भया पथक स्थापन केले आहे.

रात्रीच्या संरक्षित महिला राखीव डब्यांवर आवश्यक ती स्टीकर्स चिटकविण्यात आली आहेत.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महिला पोलीस कर्मचारी, सेवाभावी संस्था, पत्रकार व इतर महिला प्रवाशी या सदस्यांची महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.
uuuuu रेल्वे पोलीस ठाण्यांमध्ये महिला कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.
uuuuu रेल्वे स्थानिकांवर CCTV कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.
uuuuu हेल्पलाईन नंबर व फेसबुक ॲड्रेस दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

ठाणे महानगरपालिकेतील मोजे ओवळा, मोघरपाडा, भाईंदर व वडवलीच्या भागात सी.टी.सर्व्हे झाला नसल्याबाबत

u
(१६) * **u३२२७३ uuश्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड**
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(१) ठाणे महानगरपालिका अस्तित्वात येऊन ३० वर्ष उलटूनही मोजे ओवळा, मोघरपाडा, भाईंदर व वडवलीच्या भागात सी.टी.सर्व्हे झालेला नसल्याने नागरिकांना प्रॉपर्डी कार्ड व सनद मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) सनद मिळण्यासाठी नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०१५ व त्यानंतर देखील वेळोवेळी प्रशासनाकडे याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात स्थानिकांना वास्तव्यासाठी घरे बांधताना आराखडा मंजूरीसाठी परवानगी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१)१ मौजे ओवळा आणि भाईंदरपाडा या गावांच्या सनदा, मिळकतपत्रिका तयार असून, घटकदर मंजूरीवर आहे. मौजे वडवली या गावाची मोजणी पूर्ण असून, सदरच्या गावचे हक्क चौकशीचे काम प्रलंबित आहे.` तसेच, मौजे मोघरपाडा या गावचे मोजणी काम पूर्ण झालेले नाही.
(२)२ याबाबत लेखी मागणी प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही. तथापि, काही नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांना प्रत्यक्ष भेटून ही बाब निदर्शनास आणून दिली आहे.
(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दाखल होणाऱ्या विकास प्रस्तावाना ठाणे शहराकरीता मंजूर विकास नियंत्रक नियमावलीतील तरतूदीनुसार ठाणे महानगरपालिकेकडून मंजूरी देण्यात येते.
(४) व (५)५ उप अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील ठाणे महानगरपालिका हद्दीतील ३३ गावांच्या सविस्तर मोजणी कामी निविदा मागवून संबंधित अभिकर्त्याकडे मोजणीचे काम देण्यात आले आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामामध्ये राहणाऱ्या नागरिकांना मालमत्तेच्या दुप्पटीने शास्ती भरावी लागत असल्याबाबत

(१७) * **u३०८७९ uuश्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) कल्याण-डोबिवली महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामामध्ये राहणाऱ्या हजारो नागरिकांना मालमत्तेच्या दुप्पटीने शास्ती भरावी लागत असल्याने सदर प्रकरणी रहिवाशांना दिलासा द्यावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक

२९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन शास्ती रद्द करण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मागण्यांचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदर मागण्यांवर आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी नागरिकांच्या हिताचा लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारती/चाळी/सदनिका यांना पालिकेकडून बांधकाम पुर्णत्वाचा दाखला नाही, अशा बांधकामांच्या मालमत्ता करात महानगरपालिकेकडून दुप्पट शास्ती आकारण्यात येत आहे.` अनधिकृत बांधकाम झालेल्या इमारतीत घर घेणाऱ्या नागरिकांचा यात दोष नसतो. ो तथापि, अशा नागरिकांना मालमत्ता कराच्या देयकात शास्ती आकारण्यात येत आहे. ही शास्ती रद्द करावी, अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे.

uuuuu अनधिकृत बांधकामासंदर्भात दंडात्मक कारवाई ही सदर अनधिकृत बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष कारणीभूत असलेल्या व्यक्तींवर होत नसून नाईलाजास्तव वा अन्य कारणामुळे अशा अनधिकृत इमारतींमधील गाळे खरेदी करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर होते.` त्यामुळे याबाबत विचारर करण्याकरिता शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि.२८/०९/२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.` या समितीकडून या प्रश्नाबाबत ठोस स्वरुपाची उपाययोजना कालबध्दरित्या करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

u

सांगली येथील शेरीनाल्याचे पाणी कृष्णा नदीत मिसळल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका

(१८) * **u३५२८३ uuश्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली)ी:ी** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सांगली येथील शेरीनाल्याचे पाणी कृष्णा नदीत मिसळल्यामुळे सांगली, मिरज कुपवाड शहरात मोठया प्रमाणात नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली येथील कृष्णामाई घाटाजवळ बांधण्यात आलेला बंधारा फुटल्यामुळे ड्रेनेजचे पाणी कृष्णा नदीत मिसळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदुषण हटविण्यासाठी उभारण्यात आलेली शेरीनाल्याची धुळगांव योजनाही मागील ६ महिन्यापासून बंद आहे,`हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई वा करण्यात येत

आहेत
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशंत: खरे आहे.
uuuu सांगली शहरातील सांडपाणी शहरामध्ये असलेल्या शेरीनाल्यातून वाहते. शहराच्या हद्दीत असलेल्या कृष्णा नदीमध्ये कृष्णामाई घाटाजवळ पाणी अडविण्याकरीता बंधारा बांधला असून, सदर बंधाऱ्याजवळ असलेला सांडपाण्याचे गटर्स नादुरुस्त झाल्यामुळे सांडपाणी कृष्णा नदीत मिसळत होते, ही बाब खरी आहे.
uuuu तथापि, महानगरपालिकेने सदर ठिकाणी तात्काळ दुरुस्ती केली असून नागरीकाच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३), (४) व (५) सांगली शहरातून सांडपाणी वाहणारा शेरीनाला सांगली हद्दीतच कृष्णा नदीस मिळत असल्याची बाब विचारात घेऊन, केंद्रर शासनाच्या राष्ट्रीय नदी कृती योजनेअंतर्गत प्रदूषण रोखण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.
uuuu सदर प्रकल्पाअंतर्गत धुळगांव, ता.तासगांव, जि. सांगली येथे २७ द.ल.लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.` महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येतत असलेल्या सदर योजनेचे ९५% काम पुर्ण झाले असून, योजना अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेली नाही.

---

u

सेसप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि एसआरए योजना राबविणा-या विकासकांनी संक्रमण शिबीराचे तब्बल ५० कोटीचे भाडे थकविल्याबाबत

u

(१९) * **u३०८५७ uuश्री.सुनिल राऊत (विक्रोळी)ी:ी** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सेसप्राप्त इमारतींचा पुनर्विकास आणि एसआरए योजना राबविणा-या विकासकांना नागरीकांच्या पर्यायी व्यवस्थेसाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने भाडेतत्वावर संक्रमण शिबीर उपलब्ध करुन दिली आहेत. परंतू गेल्या अनेक वर्षापासून विकासकांनी सक्रमण शिबीराचे तब्बल रुपये ५० कोटीचे भाडे थकविले असल्याचीी बाब दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाडे थकविणा-या विकासकावर आणि भाडे वसुलीत कसुर करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशिल काय,
(३) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) होय, हे खरे आहे.
uuuu विकासकांना वितरीत केलेल्या संक्रमण शिबीरातील ३४४४ गाळ्यांपैकी

थकविलेल्या भाडे वव व त्यावरील व्याजापोटी माहे सप्टेंबर, २०१५ अखरे रुपये ६६.६० कोटी इतकी थकबाकी असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) विकासकांना वितरीत करण्यात आलेलया संक्रमण गाळ्यांचे भाडे थकविणाऱ्या विकासकांकडून भाडेवसुली करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे पत्र/नोटीस, सुनावणीद्वारे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. भाडे थकविणाऱ्या २० विकासकांना भाडे अदा करण्यासंबंधी तसेच विहित मुदतीत भाडे अदा न केल्यास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६६ मधील कलम १८० व ९५अ (३) अन्वये कार्यवाही करण्यात येईल, असे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. विहित मुदतीत भाडे अदा न करणाऱ्या विकासकावर उपरोक्त कलमांन्वये सक्तीच्या उपाययोजनाद्वारे वसुली व गाळा निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

कोल्हापूर येथील सहायक नगर रचनाकारास
लाच स्विकारताना पकडल्याबाबत

u
(२०) * **u३०२४७ uuश्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) कोल्हापूर येथील सहायक नगर रचनाकार या अधिकाऱ्यांस २ लाख रुपयांची लाच स्विकारताना पकडल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२), (३) व (४) उजळाईवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथील रि.स.नं.१६६/ब मधील ४४४२.३८ चौ.मीटर एवढ्या लिलावात घेतलेल्या जमिनीची ७/१२ अभिलेखात नोंद घेण्याची शिफारस करण्यासाठी तक्रारदार श्री.राजेंद्र देसाई यांचेकडे रु.१०,००,०००/- एवढ्या लाच रकमेची दोन टप्प्यात मागणी करुन दिनांक ०२.०९.२०१५ रोजी आरोपी लोकसेवक यांनी रु. २,००,०००/- एवढी रक्कम स्विकारली आहे. त्यानुसार त्यांचेविरुध्द शाहुपुरी पोलीस ठाणे येथे भाग ६, गु.र.क्र. १०३/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३(१)(ड) व १३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास

सुरु आहे. आरोपी लोकसेवक यास संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २२.०९.२०१५ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केले आहे.

---

u

राज्यातील १५ प्रमुख शहरातून दररोज ११८ कोटी लीटर पाणी वाया जात असल्याबाबत

u

(२१) * u२८३९८ uu**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यातील नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर, लातूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड या शहरांमध्ये जलवाहिन्यातील गळती, जलवाहिन्या फुटल्याने रस्त्यावरुन गटारात पाणी जाण्याचे प्रकार घडत असल्याने दररोज ११८ कोटी लीटर पाणी वाया जात असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)२ असल्यास, मराठवाडयातील आठ प्रमुख शहरांना रोज होणारा पाणीपुरवठा ३१३ एमएलडी इतका असून, वाया जाणारे पाणी चार दिवस मराठवाडयातील आठ शहरांना पुरेल इतके आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी गळती, पाईप फुटणे यातून वाया जाणारे पाणी तसेच घरगुती वापरात वाया जाणारे पाणी याला काटेकोरपणे पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४)४ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रांमध्ये जलवाहीन्यातील गळती वा त्या फुटणे यामुळे पाणी वाहून जाण्याचे प्रकार घडत असतात, हे अंशत: खरे आहे.

uuu तथापि, या संदर्भात निश्चित अशी तपासणी अद्याप करण्यात आलेली नसल्यामुळे अशा गळतीमुळे निश्चित किती पाणी वाहून जाते हे अनुमानित करता येत नाही.

uuu तथापि, अशा प्रकारची तपासणी केंद्र शासन पुरस्कृत uअमृतत अभियाना अंतर्गत हाती घेण्यात येत आहे.

(२) प्राप्त माहितीनुसार मराठवाडयातील औरंगाबाद, नांदेड, परभणी, लातूर, जालना, बीड, उस्मानाबाद व हिंगोली या आठ प्रमुख शहरांना दररोज सुमारे २८७ एमएलडी पाणी पुरवठा केला जातो.

(३) व (४) स्थानिक स्वराज संस्थांमार्फत जुन्या जीर्ण झालेल्या जलवाहिन्या

बदलणे, जलगळती दुरुस्तीची कामे करणे, वितरण व्यवस्था बळकटीकरण, वॉटर ऑडीट करुन घेणे, जलगळती रोखणेसाठी विशेष मोहिम राबविणे व हिशेब बाह्य पाणीपुरवठयाचे प्रमाण कमी करणेबाबत उपाययोजना वेळोवेळी करण्यात येत असतात.

uuuuu केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत हिशोबबाह्य पाण्याची गळती रोखण्यासाठी आवश्यक उपयोजना करण्यात येणार आहेत.

---

u

अंबड (जि.जालना) शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलींच्या वसतीगृहातील मुलींनी अधिक्षिका विरोधात केलेल्या तक्रारीबाबत

u

(२२) * **u२९००६ uuश्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१)१ अंबड (जि.जालना) शहरातील समाजकल्याण विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींच्या वसतीगृहाच्या अधिक्षिका मुलींना ६०० रुपये भत्ता देण्याऐवजी ३०० रुपये भत्ता देऊन त्यांच्या सह्या घेतात तसेच वसतीगृहात अनेक सुविधा नसल्यामुळे मुलींनी दिनांक ८ सप्टेंबर २०१५ रोजी आंदोलन करून अधिक्षिकेच्या गाडीची व कार्यालयाची तोडफोड केल्याचे प्रकरण अंबड पोलीस स्थानकात नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिक्षिकेच्या विरोधात तक्रारी असतानाही विद्यार्थिनींना अधिक्षिकेकडून धमकाविण्यात येत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांनी या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येततआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) व (३) होय.

uuuuu प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अंबड येथे गु.र.नं. २०७/२०१५, भा.दं.क. ३५४ (अ), ३५४ (ड), ५०६, ३४ सह बाल लैंगिक अत्याचार कायदा कलम ११,१२ प्रमाणे गुन्हा नोंद असून २ आरोपींना अटक करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

u

नागपूर जिल्ह्यात जिलेटिन कांडया तयार करण्याचा कारखाना असल्याबाबत

u

(२३) * u३१०१४ uu**श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागपूर जिल्हयात जिलेटिन कांडया तयार करण्याचा कारखाना असून राज्यात सर्व ठिकाणी ह्या फॅक्टरीमार्फत जिलेटिन कांडयाचा पुरवठा केला जातो तर काही ठिकाणी उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड व मध्य प्रदेश येथून थेट जिलेटिन कांडयाचा पुरवठा। करण्यात येत असून या स्फोटकामुळे राज्यात धोकादायक परिस्थिती निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

u

औरंगाबाद जिल्ह्यातील समांतर जलवाहिनी प्रकल्पाबाबत

u

(२४) * u३३२०२ uu**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील समांतर जलवाहिनी प्रकल्पासाठी पीएमसीला महानगरपालिका कोट्यवधी रुपये देत असूनही पीएमसी कोणतीच कार्यवाही करीत नाही, तसेच तिचे कार्यालयय कोठे आहे माहिती नसल्यामुळे पीएमसीची नियुक्ती रद्द करावी अशी मागणी येथील लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या दि. १३.०७.२०१५ व २०.०८.२०१५ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये पीएमसीची नियुक्ती रद्द करण्याबाबत लोकप्रतिनिधींमार्फत चर्चा उपस्थित करण्यात आली होती, हे खरे आहे.

(२) व (३) सर्व साधारण सभेमध्ये उपस्थित झालेल्या चर्चेनुसार पुढील आवश्यक कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेने करणे अपेक्षित आहे.

---

u

वसमत (ता.वसमत, जि.हिंगोली) शहरात तसेच ग्रामीण भागात अवैध मद्यविक्री होत असल्याबाबत

u

(२५) * **u३३१०२ uuश्री.तानाजी मुटकुले (हिंगोली)ी:ी** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) वसमत (ता.वसमत, जि.हिंगोली) शहरात तसेच ग्रामीण भागात वसमत-नांदेड, वसमत-परभणी, वसमत-औढा (ना.) या राज्य स्तरावरील फक्त बियर बारचा परवाना असलेल्या बारवर व अनधिकृत धाब्यांवर बियर व्यतीरिक्त देशी व विदेशी दारुची अवैध विक्री होत असल्यामुळे पोलीस विभागाने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान धाडी टाकून अवैध मद्यसाठा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध रित्या होणाऱ्या मद्यविक्रीसंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभाग काहीही कार्यवाही न करता ा दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील विना परवाना व अवैध मद्यविक्री करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच विना परवाना व अवैध मद्यविक्री बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नमुद ठिकाणी अनधिकृत धाब्यामधून देशी व विदेशी दारुची अवैध विक्रीबाबत एकूण १२ गुन्हे दाखल करुन रु. ३६,८२३/- किमतीचा अवैध मद्यसाठा जप्त केला आहे.

(२) व (३) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वसमत तालुक्यात अवैध दारु विक्री करणाऱ्या विरुध्द माहे ऑगस्ट, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ च्या तीन महिण्यात मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत ३० गुन्हे नोंदवून २० आरोंपीना अटक करण्यात आली व रु. ४४,०३६/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सबब अवैध मद्यविक्री संदर्भात दुर्लक्ष झालेला नाही.

uuuu अवैध मद्यविक्री बंद करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस

विभागाबरोबर वेळोवेळी सांघीक विशेष मोहिम राबविण्यात येतात. पोलीस विभागानेही अवैध मद्यविक्रीबाबत ३२ गुन्हे दाखल केलेले आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

u

पुण्यातील पीएमपीतील भाडेतत्वावर बससेवा पुरविणाऱ्या ठेकेदारांनी मागण्यांसाठी बससेवा बंद ठेवल्याने प्रवाशांची झालेली गैरसोय

u

(२६) * u२९३११ uu**डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुण्यातील पीएमपीतील भाडेतत्वावर बससेवा पुरविणाऱ्या ५ ठेकेदारांनी मागण्यांसाठी संचलनातील तब्बल ६५३ बस दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी बंद ठेवल्याने पुण्यातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारचीी दखल घेऊन महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम (मेस्मा) अंतर्गत ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आदेश पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.
uuu दिनांक १.१०.२०१५ रोजी दुपारपाळीमध्ये ठेकेदारांनी संचलनातील नादुरुस्ती (ऑपीरेशनल ब्रेकडाऊन) दाखवून ६५१ बसेस बंद ठेवल्या होत्या.
uuuu प्रवाशांचे हाल होऊ नये म्हणून महामंडळाच्या मालकीच्या नेहमीच्या बसेसना जादा खेपा देऊन ११२ बसेस मार्गावर आणून प्रवाशांना सुविधा दिली.
(२) याबाबत ठेकेदारांकडून कराराचे उल्लंघन होतत असल्याने बसेसचा पुरवठा न केल्यास महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम अधिनियम (मेस्मा) अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा स्वरुपाची नोटीस महामंडळाकडून दिनांक २.१०.२०१५ रोजी पासून नियमितपणे बसपुरवठा केला.
(३) महामंडळाने करारातील अटीशर्तीनुसार बसेस उपलब्ध न केल्याच्या कारणास्तव दंडात्मक कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

ब्रम्हपुरी तालुक्यातील (जि.चंद्रपुर) अनेक गावात धनश्री व प्रीमियत नावाने बोगस खतविक्री करणा-या आरोपींना अटक न करण्यात आल्याबाबत

u

(२७) * **u३५०६२ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ब्रम्हपुरी (जि.चंद्रपुर) तालुक्यातील अनेक गावात धनश्री व प्रीमियत नावाने बोगस खत व्रिकी करण्यात आल्याचे निदर्शनासआल्यानंतर पोलीसांनी आरोपींना अटक न करता चौकशी करुन सोडून देऊन वरिष्ठांकडे पाठविलेल्या अहवालामध्ये आरोपी सापडलेच नाही असे नमूद केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबधितावर कारवाई करण्याची मागणी जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबधित आरोपींवर तसेच कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

uuuuuuuuu प्रकरणी श्रीदा ॲग्रोटेक लि. अमरावती व नावीन्य ॲग्रोटेक प्रा.लि अमरावती यांचे विरुध्द शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याने ब्रम्हपूरी पो.स्टे येथे अपक्र ३०९८/१३ कलम ३(२)(१) जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार प्रतिबंधक कायदा सह कलम खंड ५ (च) १९ (सी) (७), २१, २ (जे) खंड ७ खत नियंत्रण आदेश सन १९८५ अन्वये दि. १३/१२/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.

(३) उपरोक्त गुन्ह्यातील तत्कालीन तपासी अधिकारी यांनी सदर प्ररणातील आरोपींना पो.स्टे मध्ये तपासकामी आणलेले असताना सुध्दा याबाबतची नोंद त्यांनी तपासाच्या केस डायरीमध्ये जाणीवपूर्वक घेतलेली नाही. तत्कालीन तपासी अधिकारी यांनी सदरची बाब लपवून ठेवून आरोपी मिळून येत नाही असा तपास केस डायरीमये दर्शवून सदर गुन्ह्यात uअअ वर्ग समरी मंजूरी करीता उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपूरी यांचे मार्फत न्यायालयात सादर केल्याचे आढळून आल्याने त्यांचे विरुध्द कारवाई करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी तत्कालीन तपासी अधिकारी यांची ब्रम्हूपूरी पो.स्टे येथून पोलीस नियंत्रण कक्ष, चंद्रपूर येथे दि. २७/११/२०१५ रोजी बदली करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

लातूर महानगरपालिकेस विविध योजनांकरिता प्राप्त झालेल्या निधीपैकी अखर्चित कामाचे निधीचे कार्यादेश मिळण्याबाबत

u

(२८) * **u३२४६८ uuश्री.बसवराज पाटील (औसा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) लातूर शहर नगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान योजना, नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना, सुवर्ण जयंतीच्या नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनांतर्गत २ वर्षापूर्वी अर्थात २०१२-२०१३ मध्ये २९ कोटी २५ लाख ५१ हजारांचा निधी शासनाकडून मंजूर झाला असून त्यापैकी केवळ ७ कोटी ७२ लाख ५४ हजार रुपये मार्च, २०१५ अखेरपर्यंत खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २०१२-२०१३ मध्ये मंजूर झालेल्या एकूण निधीतून अखर्चित राहिलेल्या २१ कोटी ५२ लाख ९७ हजार रुपये निधीतून दलितेतर योजना, सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना व नगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लातूर नगरपालिकेच्या दिनांक ४ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत रुपये १८ कोटीच्या निधीचे नियोजन करून या कामांना कार्यादेश देण्याचा प्रस्ताव नगरपालिकेने मंत्रालयातील नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला होता, मात्र कार्यादेश नसल्याने प्रत्यक्षात कामे सुरु झालेली नाहीत दरम्यान दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वित्त विभागाने अध्यादेश काढला आहे की, जी कामे भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत ती ३१ मार्च, २०१६ पर्यत पूर्ण करावी आणि जी कामे अद्याप सुरु झाली नाही त्यांचा निधी तात्काळ शासन जमा करावा, परिमाणत: लातूर नगरपालिका नेमकी या नियमांच्या कचाटयात अडकली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नगरपालिका आयुक्तांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना प्रस्ताव सदर अखर्चित निधीचे कार्यादेश द्यावेत, अशी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५)५ नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्राथमिक सोयी-सुविधांचा विकास योजना, नागरी दलितेतर योजना व सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) या तीन योजनाअंतर्गत लातूर महानगरपालिकेस सन २०१२-२०१३ करीता एकूण रक्कम रु. २६.२४ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधीपैकी तीनही योजनाअंतर्गत मार्च, २०१५ अखरे रु. ८.१९ कोटी खर्ची पडले असून, रु. १७.८६ कोटी अखर्चित राहीले आहेत.
(२) प्रचलित नियमानुसार २०१२-२०१३ मध्ये मंजूर केलेला रु. २६.२४ कोटीचा निधी लातूर महानगरपालिकेने माहे मार्च, २०१४ अखेर खर्ची टाकणे अपेक्षित होते.
uuuuuu लातूर महानगरपालिकेकडे अखर्चित राहीलेल्या रु. १७.८६ कोटीपैकी नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना व सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना यामधील रु. १.८५ कोटीच्या खर्चाचे नियोजन दिनांक ४ एप्रिल, २०१५

रोजीच्या ठरावाने महानगरपालिकेने केले आहे.
uuuuu तसेच,प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकास योजनेखालील अखर्चित रु. १६.०१ कोटीच्या खर्चाचे नियोजन महानगरपालिकेने माहे जून, २०१५ मध्ये केले आहे.
uuuuu अखर्चित राहीलेल्या रु. १७.८६ कोटीमधून कामांचे कार्यादेश देण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव लातूर महानगरपालिकेने शासनास दिनांक १० ऑगस्ट, २०१५ व १४ सप्टेंबर, २०१५ रोजी सादर केला आहे.
uuuuu दरम्यान शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली वित्त विभागाने निश्चित केली आहे. सदर कार्यप्रणालीनुसार जी कामे सुरु झाली नाहीत अशा कामांचा निधी महानगरपालिकेने शासन जमा करणे आवश्यक आहे, ही बाब खरी आहे.
(३) व (४) होय सदरचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. अखर्चित रकमा शासन जमा करण्याच्या वित्त विभागाच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचना सर्व विभागांवर बंधनकारक आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

वणी उत्तर क्षेत्रात (जि.यवतमाळ) मुंगोली व कोलगाव कोळसा खाणीच्या उत्खनन झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांमुळे शेत जमिनीचे झालेले नुकसान

u

(२९) * **u३७०५५ uuश्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी)ी:ी** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) केंद्र शासनाच्या अधिनस्त कोल इंडियाअंतर्गत वणी उत्तर क्षेत्रात (जि.यवतमाळ) १४ कोळसा खाणी आहेत तर मुंगोली व कोलगाव कोळसा खाणीच्या उत्खनन झालेल्या माती ढिगाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी वापराविना पडून असल्याने त्याचा फटका ६०० हेक्टर शेतजमिनीला बसला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंगोली व कोलगाव खाण क्षेत्रामध्ये वायू प्रदूषण, धुलीकण प्रदुषण व जलप्रदुषणाने मानवी आरोग्यही संकटात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मातीचे ढिगारे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

खोपोली नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात अनेक महिन्यापासून एक्स-रे मशिन व जनरेटर बंद असल्याबाबत

u

(३०) * u२८७२२ uuश्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड),डश्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत):तसन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात अनेक महिन्यापासून एक्स-रे मशिन, आपत्कालीन स्थितीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी असलेले जनरेटर बंद असून डॉक्टर व कर्मचा-यांचीही पदे रिक्त आहेत याबाबतची तक्रार खोपोलीतील नागरिकांनी मुख्य अधिकारी, खोपोली नगरपालिका यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ व तत्पूर्वी अनेक वेळा लेखी निवेदनाव्दारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून सदर रुग्णालयासाठी किती निधी उपलब्ध करुन दिला जातो व नगरपालिका किती निधी खर्च करते,

(३) असल्यास, नागरिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने रुग्णालयातील दिवसें-दिवस गंभीर होत असलेली समस्या दूर करण्यासाठी आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) या विषयाबाबत दोन वेगवेगळ्या तक्रारी/निवेदने प्राप्त झाल्या आहेत.

(२) नगरपारिषदेस शासनाकडून एकत्रित अनुदान दिले जाते. सर्व खर्च नगरपरिषद फंडातुन करत असून नगरपरिषदेच्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये २.५० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) सद्यस्थितीतील रुग्णांच्या समस्या सोडविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- खोपोली नगरपारिषदेच्या डॉ.बाबासाहेब आंबडेकर रुग्णालयात तीनही पाळीत वैद्यकीय अधिकारी व स्टाफ कार्यरत आहेत.
- सद्यस्थितीत एम.जी.एम.नवी मुंबई यांचे सोबत करारनामा करुन आवश्यक ते वैद्यकीय अधिकारी व निम वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करुन रुग्णाना तपासणी करुन वैद्यकीयय सुविधा दिल्या जात आहेत.

- एक्सरे मशिन, स्वतंत्र जनरेटर सद्या सुस्थितीत कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात घरेलू व बांधकाम कामगारांची नोंदणीची प्रक्रिया बंद असल्याबाबत

u

(३१) * u३३९४५ uuकुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी)ी:ी सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात घरेलू कामगार व बांधकाम कामगारांना न्याय मिळावा यासाठी शासनाने २०११ मध्ये सुरु केलेली नोंदणीची प्रक्रिया सद्या पुर्णपणे बंद पडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्ही कामगारांसाठी स्थापन केलेले मंडळांचे वर्षभरापासून कार्यरत नसल्याने तसेच या मंडळांवर कामगार प्रतिनिधी व इतर प्रतिनिधींची नियुक्ती न केल्यामुळे शासनाकडून निधी मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कामगारांना सदरहू योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही. दिनांक २७ मार्च, २०१५ रोजीच्या अधिसूचनेव्दारे विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांची राज्यस्तरीय घरेलू कामगार मंडळावर एक सदस्य मंडळ या नात्याने नियुक्ती झाली आहे. तसेच दिनांक २८ मे, २०१५ रोजीच्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली असून नोंदीत कामगारांना योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपुर येथे शैक्षणिक कर्जासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात आल्याबाबत

(३२) * **u३३१३० uuश्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य)य:य** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) नागपुर येथे एका खाजगी कंपनीची हुबेहुब वेबसाईट तयार करुन त्याव्दारे शैक्षणिक कर्जासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सदर प्रकरणी सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.३४/२०१५, भा.दं.वि. कलम ४१९, ४२० सह कलम ६६(क), (ड) माहिती व तंत्रज्ञान कायदा अन्वये दिनांक १२.०८.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.

uuuu परंतू प्रस्तूत प्रकरणी तपास केला असता आरोपीने तयार केलेल्या बनावट वेबसाईटवर नमूद बँक खात्यामध्ये कोणीही पैसे भरलेले नसून लोकांची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झालेले नाही. सदर प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

u
राज्यात एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिकांवर ओढवलेले आर्थिक संकट
u
(३३) * **u३०३४५ uuश्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) शासनाने दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून वार्षिक उलाढाल ५० कोटी पेक्षा कमी असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर (एलबीटी) मधून वगळले असल्याने राज्यातील महानगरपालिकांच्या उत्पनात घट झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उत्पन्नात घट आल्यामुळे महानगरपालिकांना आपल्या क्षेत्रातील विकासकामे तसेच नागरी सुविधांची कामे करणे अशक्य झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकांच्या उत्पन्नातील घट भरुन काढण्यासाठी शासन

स्तरावरुन कोणती ी उपाय योजना करण्यात आली वा येत आहे,
(४)४ नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१)१हे खरे नाही.
(२) व (३) खरे नाही.

- शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रु.५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सुट देण्याचा निर्णय घेतला आहे.
- महानगरपालिकांच्या उत्पन्नमध्ये येणारी घट भरुन काढण्यासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येत आहे.
- सहायक अनुदानाची परिगणना करताना महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील जकातीचे अथवा स्थानिक संस्था करापासूनचे सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानुन त्यावरती ८% वाढ विचारात घेऊन सन २०१५-१६ साठी प्रत्येक महानगरपालिकेस देय्य होणारे अनुदान निश्चित केले आहे.` त्यामुळे महानगरपालिकांना जकातीच्या व स्थानिक संस्था कराच्या तुलनेत आता जास्त उत्पन्न प्राप्त होत आहे.
- महानगरपालिकांचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही याची शासनाने पुरेपुर दक्षता घेतली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मुंबईतील मढ, मार्वे, डोंगरपाडा, धारवली आणि आक्सा परिसरातील लॉज व हॉटेलमधील अनैतिक व्यवसाय बंद करण्याबाबत

u
(३४) * **u३५३४४ uuश्री.सदा सरवणकर (माहिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) मुंबईतील मढ, मार्वे, डोंगरपाडा, धारवली आणि आक्सा समुद्रकिनाऱ्यावर बुडून ९३ लोकांचा जीव गेल्याची घटना तसेच तेथील हॉटेल व लॉजमध्ये अनैतीक व्यवसाय चालत असून गत काही वर्षात झालेले १४ बलात्कार इत्यादी घटनांची चौकशी करुन पोलीसांनी कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून माहे ऑगस्ट, २०१५ व तत्पूर्वी अनेक वेळा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हॉटेल व लॉजवर पोलीसांनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी कारवाई केली असतांना वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन महिलांना अटक करुन दंडात्मक कारवाई केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरात असलेल्या लॉज व हॉटेलमधील अनैतीक व्यवसाय कायमस्वरूपी बंद करण्याबाबत पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात

येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
uuu मुंबईतील मढ, मार्वे, डोंगरपाडा, धारवली आणि आक्सा परिसरातील समुद्रकिनाऱ्यावर बुडून ९८ लोकांचा जीव गेल्याच्या घटना सन १९९१ ते सन २०१५ पर्यंत झालेल्या आहेत.
uuuu सन २००६६ पासून ते` सन २०१५ पर्यत एकूण १७ बलात्काराच्या घटना या परिसरात घडलेल्या आहेत.त तसेच हॉटेल व लॉजेसमध्ये अनैतिक व्यवसाय चालत असल्याबाबत स्थानिक नागरिकांकडून तक्रारी तसेच अर्ज देवून पोलीसांनी कारवाई करावी अशी मागणी वेळोवेळी करण्यात आली होती.
(२) होय.
(३) सदर परिसरातील हॉटेल व लॉज मालकांकडून नियमभंग होत असल्याने परवानाधारकांचा कायदेशीर परवाना निलंबित करण्याबाबत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

u
मुंबईतील अष्टविनायक सिनेव्हीजनच्या संचालकाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत
u
(३५) * **u३६८८२ uuश्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) मुंबईतील अष्टविनायक सिनेव्हीजनच्या व्यवस्था प्रक्रिया संचालकाने रुपये ८२३ कोटीचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
uu
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय हे खरे आहे.
(२) होय, सदर प्रकरणी दिनांक २९.०७.२०१४ रोजी आंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र.२५८/१४ कलम ४०६, ४२०, १२० (ब), ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्याचा तपास त्याच दिवशी आर्थिक गुन्हे शाखेत गु.र.क्र.७०/१४ अन्वये घेऊन विनाविलंब तपास चालू करण्यात आलेला आहे.
uuuu श्री.अष्टविनायक सिनेव्हिजन पब्लिक लि.कंपनीचे संचालकांनी भारतात खोटी व बनावट कागदपत्राव्दारे पाच बोगस कंपन्यांची आणि दुबई येथे अष्टविनायक सिनेव्हिजन एफझेडई या कंपनीची स्थापना केली होती. बोगस

कंपन्यांच्या संचालकांना मासिक ठराविक रककमेचे अमिष दाखवून त्यांची कंपनीच्या संचालकपदी नेमणूक करुन, संचालकाना बोगस कंपनीच्या नावाने सुरु केलेल्या बँक खात्याचे सहीचे अधिकार प्रदान करुन बँक खात्याच्या कोऱ्या चेकवर संचालकांच्या स्वाक्षऱ्या घेवून त्याव्दारे बोगस कंपनीमध्ये जमा झालेली रक्कम अन्य बँकेच्या खात्यामध्ये वळवून नंतर सदर रकमेचा उपहार केल्याचे निष्पन्न झालेले आहे. तसेच आरोपीतांनी त्यांचे कंपनीचे कर्मचारी व गोडावून किपर यांना देखील संचालक केल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. बोगस संचालक व काही वैयक्तिक इसमांच्या नावे बँक खाते उघडून त्यांचा वापर केल्याबद्दल अद्यापपावतो एकूण १४ साक्षीदारांचे मा.न्यायालयासमक्ष कलम १६४ सीआरपीसी अन्वये जबाब नोंद केले आहेत. तसेच गुन्ह्यामध्ये बनावट कागदपत्रे तयार करुन ती खरी म्हणून वापरली असल्याने सदर गुन्ह्यात कलम ४०९,४६५,४६७,४६८,४७१,४७७-(अ) भादंवि वाढविलेली आहेत. सदर गुन्ह्यामध्ये आरोपीत कंपनीचे संचालकासह कंपनीचे चार्टड अकाऊटंट व इतर असे एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

uuuuu सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

कोल्हापूर जिल्ह्यातील रंकाळा तलावाच्या प्रदूषणाबाबत

u

(३६) * u२९०६५ uuश्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर)र:र सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१)१कोल्हापूर जिल्ह्यातील रंकाळा तलावाच्या प्रदूषण मुक्तीसाठी राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेतून ८ कोटी रुपये खर्च करूनही काम अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सरंकाळा तलावाच्या प्रदूषणाचा प्रश्न अजूनही सुटला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीत दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येणार आहे,

(४)४ तसेच, सदर कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)५ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अंशत: खरे आहे.

uuuuuuu केंद्र शासनाकडील राष्ट्रीय तलाव संवर्धन योजनेअंतर्गत रंकाळा तलाव संवर्धनासाठी मंजूर झालेल्या रु. ८.६५ कोटी इतक्या निधीतून तलावात

मिसळणारे सांडपाणी रोखण्याची कामे कोल्हापूर महानगरपालिकेने प्राधान्याने पूर्ण केलेली आहेत.
uuuu तलावातील नायट्रेट व फॉस्फेटयुक्त गाळ काढणे, नाल्यावर टर्शरी प्रक्रिया केंद्र बांधणे इ. कामासाठी नवीन रु. ७५.६५ कोटी चा सविस्तर प्रकल्प तयार करणेचे काम अंतीम टप्प्यात आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी मा. हरीत लवाद, पुणे येथे दावा सुरु असून मा. लवादाने सदर प्रस्तावित काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करता येईल किंवा कसे याबाबत त्यांचे अभिप्राय मागविले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जवळील रामनगर भागात साई कोल्ड स्टोरेजवरील छाप्यात गोमांस जप्त करण्यात आल्याबाबत

(३७) * u३२०६५ uu**श्री.सरदार तारासिंह (मुलुंड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) बीड जवळील रामनगर भागात साई कोल्ड स्टोरेजवर पोलीस व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी घातलेल्या छाप्यात ३० ते ४० हजार किलो गोमांस तसेच दोन एसी कन्टेनर व एक चारचाकी वाहन आणि ४७ परप्रांतीय कामगारांना अटक करण्यात येऊन सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाजीपाला, फळे व इतर साहित्य ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या अनुदानावर सुरु करण्यात आलेल्या या कोल्ड स्टोरेज मध्ये गोमास पॅकिंग केले जात होते याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांचेकडे ४ ते ५ महिन्यांपूर्वी लेखी तक्रारी देण्यात येऊनसुध्दा त्यांनी या तक्रारींची दखल न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच राज्यात गोवंश हत्या बंदी असतांनाही सदर कोल्ड स्टोरेजमध्ये इतक्या मोठया प्रमाणात गोमास सापडल्याने मालक तसेच अटक केलेल्या व्यक्तीं विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय. परंतू सदर घटना दिनांक २१.०८.२०१५ रोजी घडली आहे.
(२) व (३) सदर घटनेच्या चार ते पाच महिन्यापूर्वी लेखी तक्रार प्राप्त झालेला नाही. तथापि दिनांक २१.०८.२०१५ रोजी सदर घटनेची माहिती प्राप्त होताच कायदेशीर कार्यवाही करुन पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे बी.

गु.र.नं. ३०२३/२०१५ कलम ५ अ,ब,क, कलम ९ अ, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ व कलम ११ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकरणात ४७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मेहकर (जि.बुलढाणा) येथे बँकेच्या एटीएमवर पैसे काढण्यासाठी गेलेल्या चार जणांना पोलिस उपनिरिक्षकाने बेदम मारहाण केल्याबाबत

u

(३८) * **u३२६९८ uuडॉ.संजय रायमुलकर (मेहकर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मेहकर येथील (जि.बुलढाणा) जिजाऊ चौकामध्ये असलेल्या स्टेट बँकेच्या एटीएमवर पैसे काढण्यासाठी गेलेल्या चार जणांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास पोलिस उपनिरिक्षक श्री. अमोल ढाकणे यांनी कमरेच्या पट्टयाने बेदम मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चार जणांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपनिरिक्षकाच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये तक्रारही दाखल करुन घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित पोलिस उपनिरिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

uuuuu दिनांक १५/१०/२०१५ रोजी नमूद पो. उप निरीक्षक यांना एटीएम सुरक्षागार्ड याने चार व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली बाबत कळविले असता सदर पो. उपनिरिक्षक यांनी सदर चार व्यक्तीजवळ विचारपूस केल्यावर त्यांनी समाधानकारक उत्तरे` न दिल्याने` त्यांना पो. स्टे. ला नेले. सदर प्रकरणी चौकशी करुन उपरोक्त चार व्यक्तींकडे आढळून आलेले एटीएम कार्ड मुळ मालकाच्या ताब्यात देवून सदर चार व्यक्तींना सोडून दिले. तथापि त्यांना मारहाण केलेली नाही.

(२) उक्त नमूद चार व्यक्तीपैकी तीन व्यक्ती दि. १६/१०/२०१५ रोजी ग्रामीण रुग्णालय, मेहकर येथे स्वत:हून भरती झाले होते. वैदयकीय अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये दोन व्यक्तींच्या शरीरावर माराचे निशाण नाही, व एका व्यक्तीच्या अंगावरील उजव्या टोंगळयावर साधी जूनी जखम असून ती ४ ते ५ दिवस अगोदरर असल्याचे रुग्णपत्रिकांमध्ये नमूद केलेले आहे. त्यांना

रुग्णालयातून त्याच दिवशी डिस्चार्ज केलेले आहे.
(३) व (४) तक्रार दाखल करण्यास नमूद ४ व्यक्ती पैकी कोणीही व्यक्ती पे ालीस स्टेशनमध्ये आलेला नाही. तथापि दि. २४/१०/२०१५ रोजी मारहाण केल्याबाबत एक तक्रार अर्ज टपालाने प्राप्त झालेला आहे.
uuuuu सदर अर्जावर कार्यवाही सुरु असून अर्जदार व इतर चौकशीसाठी प्रतिसाद देत नसल्याने प्रकरण चौकशीवर प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

धुळे शहरासह परिसरात मोटार सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

u

(३९) * u३०४५४ uuश्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) ा: ा
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) धुळे शहरासह परिसरात मोटार सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सतत होणा-या मोटार सायकल चोरीच्या घटना थांबविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) माहे २०१५ मध्ये शिरपूर शहर पोलीस ठाण्यात ०६, दोंडाईचा पोलीस ठाणे येथे ०४, पश्चिम देवपूर पोलीस ठाणे, ०१, धुळे तालुका पे ालीस ठाणे ०१, धुळे शहर पोलीस ठाणे ०१, सिंदखेडा पोलीस ठाणे ०१, देवपूर पोलीस ठाणे ०१ असे एकूण १५ मोटार सायकल चोरीचे गुन्हे दाखल आहेत.
(२) मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडणार नाहीत यासाठी रात्रीची पेट्रोलींग सक्त केली असून बिट मार्शलची रात्रग्रस्त वाढविली ी आहे. त्यांना चेकक करण्यासाठी सर्कल चेंर्किग अधिकारी यांना नेमुन वेळोवेळी चेक करण्यात येत असतात मोटार सायकल चोरीचे प्रकार रोखण्याकरीता दिवसा देखील बिट मार्शल यांची कॉलनी परिसरात, निर्जन रोडावर तसेच चौकात व बाजर पेठेत गस्त वाढविण्यात आली आहे. तसेच रात्री पेट्रोलींग करणा-यांकडून सराईत व माहितगार गुन्हेगार चेक करण्यात येतात. गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येते दिवसा सुध्दा पोलीस ठाण्याच्या अधिनस्त असलेल्या पेट्रोलींग वाहने सतात पेट्रोलींग करत आहेत.
uuuuu देवपूर पोलीस ठाण्यात दाखल एका गुन्ह्याच्या तपासात ३ आरोपींना ा अटक करुन त्यांनी धुळे जिल्हा परिसरातील चोरलेल्या रु.३,५०,०००/- किंमतीच्या

१७ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

u

पुणे येथे मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ५०० चौ.फूटापर्यंतच्या सदनिकाधारकांचा मिळकत कर रद्द करण्याबाबत

u

(४०) * **u३७११९ uuश्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे येथे मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ५०० चौ.फूटापर्यंतच्या सदनिका धारकांचा मिळकत कर रद्द करावा या मागणीसाठी एका राजकीय पक्षांच्यावतीने स्वाक्षरी अभियान घेणार असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन ५०० चौ. फूटापर्यंतच्या सदनिका, वाडे, घरे, व जागांसाठी असलेला मिळकत कर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अशी बाब पुणे महानगरपालिकेच्या निदर्शनास आली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

उदगीर (जि.लातूर) नगरपालिकेच्या महाराष्ट्र नगरोत्थान योजनेत झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

u

(४१) * **u३१४९२ uuश्री.सुधाकर भालेराव (उदगीर)र:र** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) लातूर जिल्हयातील उदगीर नगरपालिकेला नगरोत्थान योजनेंतर्गत झालेल्या कामासाठी ८१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८१ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या तक्रारीनंतर आयुक्तांमार्फत चौकशी समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने त्याचा अहवाल सादर केला आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत उदगीर नगरपरिषदेस रस्ते विकास प्रकल्पाकरीता रु. ७७ कोटी एवढ्या रकमेच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. `यापैकी उदगीर नगरपरिषदेस रु.६१.६३ कोटी एवढा निधी प्राप्त झाला आहे.
(२) होय.
(३) व (४) या प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या स्तरावर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल अद्याप सादर केलेला नाही.
uuuuu विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना याबाबतचा अहवाल सत्वर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ठाण्यातील नौपाडा भागातील कृष्णा निवास ही तीन मजली इमारत कोसळल्याबाबत

u
(४२) * u३०२९९ uu**श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.के. सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.सदा सरवणकर (माहिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) ठाण्यातील नौपाडा भागातील बी.कॅबिन परिसरातील कृष्णा निवास ही तीन मजली इमारत कोसळून यामध्ये १२ जणांचा मृत्यु व ७ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेनंतर ठाणे व मुंबई परिसरातील धोकादायक इमारतीचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर घटनेतील मृत्यु पावलेल्या व जखमी व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, धोकादायक इमारतीबाबत शासनाने कोणते धोरण आखले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर दुर्घटनेबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर अतिरिक्त आयुक्त (२), ठाणे महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली

असून सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
uuuu सदर दुर्घटनाग्रस्त इमारत कोसळण्यासाठीच्या कारणांचा तांत्रिक अहवाल VJTI (व्ही.जे.टी.आय.) कडून अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

तसेच सदर दुर्घटनाग्रस्त इमारती प्रकरणी पोलीस विभागाकडून नौपाडा पोलीस स्टेशन येथे अकस्मित मृत्यू रजि.नं.४४/१५, सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
uuu सदर दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व जखमी व्यक्तींच्या कुटुंबियाना ठाणे महानरगपालिकेकडून आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) मुंबई महानगर प्रदेशातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना ३० वर्षा पूर्वीच्या इमारतींना दरवर्षी पावसाळ्याअगोदर सरंचनात्मक लेखा परिक्षण करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
uuuu ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी समुह विकास योजनेव्दारे करणेबाबत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करावयाच्या फेरबदलाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१ अ`अ`) अन्वये शासनामार्फत दिनांक ४.३.२०१४ रोजी प्राथमिक उध्दघोषणा महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे.
uuuuu त्यानुसार नागरीकांच्या हरकती/सुचना मागविण्यात येऊन त्यावर ठाणे महानगरपालिकेने दिनांक २६.६.२०१४ अन्वये ठाणे महानगरपालिकेचे अभिप्राय शासनाकडे सादर केलेले आहेत. सदर बाबत शासन स्तरावर नियमावली अंतिम करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

नागपूर शहरात वाढत असलेल्या गुन्हेगारीबाबत

u

(४३) * u३५५८८ uu**श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी)**ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागपूर शहरात माहे ऑगष्ट २०१५ ते ऑक्टोंबर २०१५ या तीन महिन्यात जवळपास ३० लोकांची हत्या, ४६ दरोडे आणि लुटमारीच्या घटना तसेच ५० ते ६० महिलांवर झालेले बलात्कार याकडे पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागपूर शहरात गुन्हेगारी वाढत असल्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरातील नागरिकांसह महिलांमध्ये असुरक्षितता असल्याची भावना निर्माण होवून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्रश्नात नमूद कालावधीत २३ हत्याचे गुन्हे दाखल असून २०१४ च्या तुलनेत ३ ने कमी आहेत. दरोडा सदराखालील ६ गुन्हे दाखल आहेत त्यात वाढ वा घट नाही. लुटमारीचे ११६ गुन्हे दाखल असून सन २०१४ च्या तुलनेत ४ ने वाढ झाली आहे. बलात्कार सदराखाली ४४ गुन्हे दाखल असून सन २०१४ च्या तुलनेत २२ ने वाढ झाली आहे.

(२) नागपूर शहरातील नागरीकांसह महिलांमध्ये असुरक्षितता असल्याची भावना निर्माण होऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे असे म्हणता येणार नाही.

(३) नागपूर पोलीस आयुक्तालयांतर्गत गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पेट्रोलिंग, नाकाबंदी करणे, सोनसाखळी चोरी प्रतिबंधक विशेष पथक कार्यान्वित करणे, मोबाईल ॲप uआय वॉच पोलीसस सुरु करणे, गुन्हेगारीविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करणे, पोलीस विभागामार्फत कार्यशाळा आयोजित करुन जनतेला माहिती देणे इत्यादी कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच महिला अत्याचारास प्रतिबंध घालण्यासाठी ऑपरेशन मुस्कान, छेडखानी विरोधी पथक महिला हेल्पलाईन, सायबर अवेरनेस, शाळा-महाविद्यालय जनजागृती, ऑपरेशन रक्षक त्यामध्ये महिला मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण, विरळ क्षेत्र, पडीत इमारती भागात पेट्रोलींग, सेफ गार्ड अवेरनेस कॅम्पेन अशा विविध योजना कार्यान्वित आहेत.

शरीराविषयक/मालत्तेविषयक/महिला विरुध्द अत्याचार रोखण्यास पोलीस आयुक्तालय नागपूर याच्या कडून ठोस पाऊल उचलण्यात आले असून विविध योजनेवर कार्यवाही सतत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

राज्यात माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर जीवघेणे हल्ले होत असल्याबाबत

u

(४४) * u२९८२७ uuश्री.विजय औटी (पारनेर), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य):य:य सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात १० वर्षात माहितीच्या अधिकाराचा वापर करुन माहिती मागविणाऱ्या १० कार्यकर्त्यांना जीव गमवावा लागला असून सुमारे ६० माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर जीवघेणे हल्ले झाल्याचे कॉमनहेल्थ ह्यूमन राईटस इनिशिएटिव्हच्या आकडेवारीत दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणामध्ये दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यांना शासनाकडून संरक्षण

देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
uuuu राज्यात माहिती अधिकारी कार्यकर्ते यांचेसंबधी एकूण १० गुन्हे दाखल असून त्यापैकी एका गुन्ह्यात १ कार्यकर्त्यांचा मुत्यू झालेला आहे. तसेच इतर चार गुन्ह्यात ४ कार्यकर्ते जखमी झालेले असून उर्वरित पाच गुन्ह्यात ५ कार्यकर्ते यांचेवर हल्ला करुन धमकी देण्यात आलेली आहे.

(२) उपरोक्त १० गुन्ह्यांपैकी ४ गुन्हे पोलीस तपासावर असून ४ गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच एक गुन्हा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सीबीआयकडे वर्ग करण्यात आलेला असून एका गुन्ह्यामध्ये न्यायालयाने आरोपींना दोषमुक्त केलेले आहे.
uuuu मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ४६६/२०१० मध्ये दिलेल्या ओदशानुसार माहिती अधिकार कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याबाबत जिल्हा/परिमंडळ, प्रादेशिक विभाग व राज्य शासनस्तरावर समिती गठित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे माहिती अधिकार कार्यकर्त्यांना संरक्षण देण्याबाबत कायदा बनविण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव शहरातील शिवाजीनगर उड्डाण
पुल दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबत

(४५) * u३२९३५ uuडॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल)ल:ल सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) जळगांव शहरातील शिवाजीनगर उड्डाण पुलाला १०२ वर्षे पूर्ण झाल्याने सदर पुलाचे आयुष्य संपले असून तो धोकादायक ठरल्याचे रेल्वे बोर्डाने जळगांव महापालिकेला कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तातडीने महापालिकेने सुमारे साडे सहा कोटी रुपये न भरल्यास सदर पुल वाहतुकीस बंद करण्यात येईल असा इशारा देखील दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,य चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जळगांव शहरातील शिवाजीनगर उड्डाण पुलल बांधकामासाठी निधी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) होय.
जळगाव महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने रेल्वे विभागाने सूचित केल्यानुसार सदर रु. ६.२५ कोटी रकमेचा भरणा करता

आलेला नाही.

(३) रेल्वे विभागाच्या सूचनांनुसार सदर पुलावरील अवजड वाहतुक बंद करण्यात आलेली आहे.
रेल्वे पुलासाठी निधी उभारणे महानगरपालिकेस शक्य होत नसल्याने महानगरपालिका महासभा ठराव क्र. २६१, दि. २६.६.२०१५ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार या कामासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेबाबत महानगरपालिकेकडून संसद सदस्यांना विनंती करण्यात आली असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
uuuu वरील वस्तुस्थिती जळगाव महानगरपालिकेने रेल्वे विभागास दि. ११.९.२०१५ च्या पत्रानवये कळवली आहे.
(४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

देवबाग-तारकर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्र किनारपट्टीवर धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

u

(४६) * **u३४६१८ uuश्री.वैभव नाईक (कुडाळ)ळ:ळ** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) देवबाग-तारकर्ली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) समुद्र किनारपट्टीवर संरक्षक व धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात यावा अशा आशयांच्या मागणीचे एक निवेदन स्थानिक लोकप्रितिनिधीनी दिनांक २५ जुलै, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री आदीकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवबाग-तारकर्ली या गावांची दरवर्षी समुद्राच्या आक्रमणामुळे प्रचंड प्रमाणात धूप होवून कोटयावधी रुपयांचे सार्वजनिक तसेच खाजगी मालमत्तेचे नुकसान होत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी गत १५ वर्षापासून सातत्याने संरक्षक व धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याची मागणी केली असता कोटयावधी रुपयांचा खर्च करुन निकृष्ट दर्जाचे धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्याधर्तीवर श्रीवर्धन शासकीय निवासस्थानाच्या मागील बाजूस समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा व सुशोभिकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे त्याच धर्तीवर देवबाग-तारकर्ली समुद्र किनारापट्टीवर धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय, हे खरे आहे.
(२) देवबाग-तारकर्ली येथील समुद्रकिनाऱ्याची लाटांच्या तीव्र माऱ्यामुळे नेहमीच धूप होत असते.` तथापि, त्यामुळे तेथील सार्वजनिक तसेच खाजगी मालमत्तेस कोणत्याही प्रकारे नुकसान झालेले नाही. सदर ठिकाणी सा.बां. विभागाकडून सन २००८-०९ या कालावधीमध्ये ९० मी. लांबीच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम तसेच सन २०१०-११ या कालावधीत जीओ ट्युब बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून दोन्ही कामे आजमितीस सुस्थितीत आहेत.त सदर ठिकाणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डा मार्फत तात्पुरत्या स्वरुपात दगड टाकून धूप थांबविण्यात आली असून सदर कामे सुस्थितीत आहेत.
(३) निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील बोरीवली (प) कस्तुर पार्क येथील आरक्षित भूखंडावरील अनधिकृत बांधकामाबाबत

u

(४७) * u२९३५९ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)ी:ी सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील बोरीवली (प) कस्तुर पार्क येथील सी.टी.एस क्रमांक ५१९, ५१९ (१) ते ७७ हा ३० हजार चौ.मि.भूखंड महानगर पालिकेने कॉलेजसाठी राखीव ठेवला होता मात्र त्यावर खाजगी विकासकाने खाजगी मालमत्ता (शॉपिग मॉल) बांधले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ ला निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने बोगस कागदपत्राच्या आधारे सर्व बांधकामाच्या परवानग्या घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) मुंबई, बोरीवली (पश्चिम) कस्तुर पार्क येथील अंतिम भूखंड १७९ (सी.टी.एस. क्र. ५१९, ५१९/१ ते ७७) हा २९,७७७.३० चौ.मी. क्षेत्र कॉलेजकरीता आरक्षित आहे. या भूखंडावरील सहा ठिकाणचे १६,५६० चौ.मी. झोपडपट्टीने बाधित क्षेत्र विचारात घेऊन बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(१०) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास प्रथम दिनांक १५.४.२००५ रोजी व नंतर दिनांक १८.६.२००९ रोजी सुधारित आशयपत्र दिले आहे. सदर योजनेमध्ये ८ पुनर्वसन घटकाची इमारती व १ विक्री घटकाची इमारत (विंग ए, बी व सी) बांधण्याचे प्रस्तावित आहे. विक्री घटकांमध्ये विंग ए तळ घर ते १६ मजले, विंग बी चे तळ घर ते १४ मजले

व विंग सी मधील तळ घर ते १५ मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे.` त्यापैकी विंग सी मध्ये तळ मजल्याच्या काही भागात दुकाने बांधली आहेत.
(२) व (३) या भूखंडावरील बोरभाट सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ट-२ सहाय्यक महापालिका आयुक्त, आर/मध्य यांनी दिनांक १८.१२.२००४ अन्वये/ निर्गमित केले होते. सदर योजनेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांकक २६/२०१० दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४.३.२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रकरण उच्चस्तरीय समितीकडे वर्ग करण्यात आले होते.` या संदर्भात उच्चस्तरीय समितीकडे दाखल विशेष अपील क्रमांक १/२०१० मध्ये समितीने दिनांक २१.५.२०११ रोजी आदेश पारित केले आहेत. अपीलार्थींनी उच्चस्तरीय समितीच्या प्रस्तुत आदेशास व योजनेस दिलेल्या आशयपत्रास जनहित याचिका क्रमांक ४०/२०११ अन्वये मा.मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलेले आहे.` या प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २१.८.२०१५ च्या आदेशान्वये शासनास शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिलेले असून सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २१.१.२०१६ रोजी ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्रात मच्छिमारासाठी गेलेल्या स्थानिकांच्या जाळी तुटून झालेले नुकसान

u

(४८) * **u३८३१३ uuश्री.संजय पोतनीस (कलिना) I: I** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्रात मच्छिमारासाठी गेलेल्या स्थानिकांच्या ३० छोट्या नौकांच्या जाळ्यावरुन परप्रांतिय नौका गेल्याने जाळी तुटल्याने नौका मालकांचे सुमारे २० लाखाचे नुकसान झाल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच तारामुंबरी येथील श्री. सुशांत भाऊ प्रभू यांनी कर्ज काढून नवीनच घेतलेल्या आई भवानी या फायबर नौकेवरील सर्वच्या सर्व २६ जाळी परप्रांतिय नौकांनी तोडल्यामुळे त्यांचे सुमारे चार लाखाचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पोलीस निरीक्षक श्री. मधुकर आबाले व मत्स्यव्यवसाय अधिकारी श्री. पी.बी.सुर्वे यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने परप्रांतिय ट्रॉलर्सवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. एकनाथराव खडसे : (१) होय.
(२) होय.
(३) होय. सहाय्यक आयुक्त, मत्सव्यवसाय, सिंधुदुर्ग - मालवण यांचेकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(४) होय, दिनांक १६.१०.२०१५ रोजी पोलीस विभागाच्या स्पीड बोटीचे सहाय्याने देवगड येथील समुद्रात संयुक्त गस्त घालण्यात येऊन परराज्यातील एक नौका पकडण्यात आली. सदर नौकेवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव जि. बुलडाणा येथील खामगाव नगर परिषदे अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

u
(४९) * **u३३२७५ uuश्री.आकाश फुंडकर (खामगांव)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) खामगाव जि. बुलडाणा येथील खामगाव नगर परिषदे अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे अशी तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरकुलांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या घरकुलांचे लाभार्थी राहायला जाण्यास तयार नाही व ही घरकुल अद्यापपर्यंत लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यात आले नाही,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम केल्याप्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करण्यात येऊन दोषी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, गरजू लाभार्थ्यांना तात्काळ घरकुल हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) मुख्याधिकारी, नगरपरिषद खामगांव यांचे अहवालानुसार येथीलल आयएचएसडीपी योजनेतील एकूण १४३० मंजूर घरकुलांपैकी १२४२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित १८८ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेल्या १२४२ घरकुलांपैकी आजपावेतो १६६ लाभार्थ्यांनी लाभार्थी हिस्सा भरुन घरकुलाचा लाभ घेतला आहे.` परंतु उर्वरित १०७६ घरकुलांपैकी ४९६ लाभार्थ्यांनी खालील नमूद कारणास्तव घरकुलाचा लाभ घेण्यास तयार नसल्याचे

खामगांव नगरपरिषदेस लेखी कळविले आहे.

१) या दरम्यान स्वखर्चाने पक्की घरे बांधलेली आहेत.

२) या गावातून स्थानांतरण केले आहे.

३) राहते घर सोडून इतरत्र जाण्याची इच्छा नाही.

४) सदर योजनेचा लाभ घेण्याची इच्छा नाही.

५) वैयक्तीक कारणामुळे.

(३) प्रस्तुत घरकुलांची केंद्र शासनाच्या बीएमटीपीसी दिल्ली येथील मुख्य अभियंता यांच्या पथकाने दि. २७.९.२०१० रोजी तसेच म्हाडाच्या दक्षता व गुणनियंत्रक विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या पथकासमवेत अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यकारी अभियंता । यांनी दि. २६.९.२०१२ व दि. ५.११.२०१२ रोजी प्रकल्पाच्या बांधकामाची तपासणी केली आहे.` याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.` तसेच आयएचएसडीपी योजनेतील प्रकल्पांची तपासणी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या त्रयस्थ तपासणी व देखरेख संस्थेच्या (TPIMA) अधिकारी यांनी प्रकल्पाला वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत.त घरकुलांच्या बांधकाम साहित्याचे चाचणी अहवाल वेळोवेळी प्रयोगशाळेतून मागविण्यात येतात. याशिवाय सदर योजनेच्या कामाची स्थिरता (Structural Stability) तपासण्यात आली असून सदर घरांचे आयुष्य ५०-५५ वर्ष इतके प्रमाणित केले आहे. वरील तपासणीमध्ये कामाची गुणवत्ता व दर्जा समाधानकारक आढळून आलेला आहे.

(४) व (५) ज्या लाभार्थ्यांनी घरकुलाचा लाभ घेण्यास नकार दिला आहे.` अशा लाभार्थ्यांच्या जागी इतर गरजू व पात्र लाभार्थ्यांची निवड करणे व नवीन लाभार्थ्यांची प्रारुप यादी तयार करण्यासाठी कालावधी लागला आहे. सदरहू यादी अंतिम करण्याची कार्यवाही सुरु असून या यादीला जिल्हा गृहनिर्माण समितीची मंजूरी प्राप्त झाल्यावर लाभ देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

मालेगांव (जि.नाशिक) येथील अप्पर जिल्हाधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी अटक केल्याबाबत

(५०) * u३५२४३ uu**श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील अप्पर जिल्हाधिकारी श्री. रामचंद्र पवार यांच्यासह ठेकेदार श्री. दिनेशभाई पंचासरा यांनी जमिन व्यवहार प्रकरणात फौजदारी कारवाईची नोटीसस टाळण्यासाठी ५० लाख रुपयांची मागणी केल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय. या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगाव श्री.रामचंद्र पवार यांनी खाजगी व्यक्ती श्री.दिनेशभाई पटेल यांचेमार्फतीने रु.३५,००,०००/- इतकी लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केल्याने त्यांना दिनांक ०६.०८.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती.

(२) व (३) याप्रकरणी अपर जिल्हाधिकारी, मालेगाव श्री.रामचंद्र पवार व खाजगी व्यक्ती श्री.दिनेशभाई पटेल यांचेविरुध्द भद्रकाली पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.क्र.३१३६/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७,८,१२,१३(१)(ड), १३(२) व १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे या भागात मेट्रो-१, मोनोरेल, नवी मुंबईतील मेट्रो इ. कामांच्या कंत्राटात झालेली अनियमितता

(५१) * u२८८०६ uuडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर)र:र सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) राज्यातील मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे या भागात मेट्रो-१, मोनोरेल, नवी मुंबई मेट्रोची कामे, नवी मुंबई विमानतळ, सांताक्रूझ-चेंबूर लिंक रस्ता यांची कामे मिळविण्यासाठी अमेरिकन लुईस बर्जर या कंपनीने तत्कालीन शासनातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना पैसे देवून कंत्राटे घेतल्याबाबतची चौकशी अतिरिक्त मुख्य सचिवामार्फत करण्याच्या निर्णय मा. मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत किती व कोणते अधिकारी दोषी आढळून आले आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) होय. महाराष्ट्र राज्यामध्ये लुईस बर्जर या कंपनीने सल्लागार म्हणून काम करताना राबविण्यात आलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंपन्यांची निवड करताना, निवड प्रिक्रियेमधील पारदर्शकता, त्यांना देण्यात आलेले दर, त्यांच्याकडून करण्यात आलेली कामे व कामांची गुणवत्ता याचा तपास करुन त्यामध्ये काही अनियमितता झाली आहे किंवा कसे, याबाबतची चौकशी करण्यासाठी दि.०७/१०/२०१५ रोजी १ सदस्यीय समिती गठीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

uuuu सदर समितीचे अपर मुख्य सचिव (गृह) हे सदस्य आहेत. सदर प्रकरणी चौकशी सुरु असून सदर समितीने आपला अहवाल तीन महिन्यात सादर करावयाचा आहे.

मुंबईतील सांताक्रुझ, गोळीबार येथील शिवालीक बिल्डर्सकडून एसआरए योजना राबविली जात असल्याबाबत

(५२) * **u३२७४१ uuश्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व)व:व** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सांताक्रुझ, गोळीबार (मुंबई) येथील ६२ एकर जमिनीवर शिवालीक बिल्डर्सकडून एसआरए योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६२ एकर जमिनीपैकी संरक्षण खात्याच्या मालकीच्या १२ एकर जमिनीचे बनावट दस्ताऐवज तयार केल्याप्रकरणी शिवालीक व्हेंचर्स विरोधात दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी निर्मलनगर पोलीस स्थानकात गुन्हाही दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातांक्रुझ, गोळीबार येथील ६२ एकर जमिनीवरील पुनर्विकासात अनेक बोगस झोपडपट्टीधारकांची नावे घुसवून पात्रता प्राप्त झोपडपट्टीवासियांची नावे वगळण्यात आली आहेत अशा तक्रारी म्हाडाला वारंवार प्राप्त होऊनही त्यानुषंगाने तात्काळ कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत व या सर्व प्रकरणात एसआरएचे तत्कालीन प्रमुख, तत्कालीन रजिस्टार व शिवालीकचे संचालक मंडळ यांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा एकूण कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के अन्वये गोळीबार, सांताक्रुझ (पूर्व) येथील मे.शिवालीकव्हेंचर्स या विकासकाच्या एकात्मिक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस शासन पत्र दिनांक २९.८.२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे.` या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकास २९.४ एकर क्षेत्रासाठी दिनांक ६.११.२०१५ रोजी सुधारित आशयपत्र निर्गमित केले आहे.

(२) श्री.कमलाकर शेणॉय यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार मा.महानगर दंडाधिकारी ३२ वे न्यायालय बांद्रा, मुंबई यांनी सी.आर.पी.सी. कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.` त्यानुसार पोलीस ठाणे

निर्मलनगर, मुंबई येथे दि. ०६.८.२०१५ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात क्रिमिनल रिट पिटीशन क्र. ३२२१/२०१५ व इतर अशाच रिट पिटीशनमध्ये एकत्रितरित्या सुनावणी होवून मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.०९.१०.२०१५ च्या आदेशान्वये सी.आर.पी.सी. १९७३ च्या कलम १५६ (३) अन्वये दिलेले आदेश तसेच नोंदविलेले एफ.आय.आर. रद्द केले आहेत. याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे सविस्तर आदेश अप्राप्त आहेत.

(३) जमिनीची मालकी विचारात घेऊन शासनाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ व कलम ३५(१) अन्वये अनुक्रमे सक्षम प्राधिकारी व अपीलीय प्राधिकारी घोषित केले आहेत.त सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या परिशिष्ट-२ बाबत तक्रारी असतील तर त्याविरुध्द उक्त अधिनियमाच्या कलम ३५ (१) अन्वये संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे दाद मागणे आवश्यक आहे.

(४) बृहन्मुंबईतील ६ योजनांबाबत प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये प्रस्तुत सांताक्रुझ, गोळीबार येथे मे. शिवालीक व्हेंचर यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेंबाबतही चौकशी करण्यात आली होती. या चौकशी अहवालामध्ये पात्रते संदर्भातील काही तक्रारी असतील तर त्याबाबत संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे त्या तक्रारी अपील स्वरुपात देण्यात याव्यात व अशा तक्रारी प्राप्त झाल्यापासून अपिलीय प्राधिकाऱ्यांने ३० दिवसांच्या आत अपील निकाली काढावे असे समितीच्या अहवालात निदेश देवून अहवालाच्या प्रती तक्रारदारासह सर्व संबंधितांना शासन पत्र दिनांक २८.३.२०१४ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मुंबईतील परळ येथील वहिवाटीचा मुख्य रस्ता विकासकाने आराखड्यातून वगळल्याबाबत

u

(५३) * u२८८३७ uuॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम)म:म सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील परळ येथील ग. द आंबेकर मार्गावर असणा-या खापरीदेव म्हाडा इमारती जवळील वहिवाटीचा मुख्य रस्ता विकासकाने गिळंकृत केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चिंचोळ्या वाटेवर अग्निशामक दलाचे वाहन व पाण्याचे वाहन इमारती पर्यंत पोहचू शकत नसल्याने एखादी मोठी दुर्घटना घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अग्निशमन दलाच्या मंजूर आराखड्यामध्ये पोच रस्ता ग द आंबेकर मार्गापर्यंत न जाता अर्ध्यावर दाखविण्यात आला असून सदर रस्ता आराखड्यातून गायब झालेला दाखविण्यात आल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशी नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) सदर रस्ता हा महापालिकेचा रस्ता नसून विकासकाने स्वत:च्या ताब्यातील भूखंडावरुन मागील बाजूस असलेल्या खापरीदेव सदन या जुन्या म्हाडाच्या इमारतीपर्यंत पोहोचण्यासाठी सोडलेला पोचरस्ता आहे. सदर रस्ता मोकळा असून त्यावर कार पार्किंगसाठी परवानगी देण्यात आलेली नाही किंवा कार पार्किंग करणे अपेक्षित नाही.
uuuu सदरचा पोहोच रस्ता (Right of way) ५ मीटर रुंदीचा असून या रस्त्यावर खाजगी वाहने पार्क केलेली असल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत अग्निशामक दलाचे वाहन इमारतीमध्ये पोहचू शकत नाहीत.
uuuu तथापि सदर रस्त्यावर वाहने पार्क करण्यात येऊ नयेत अशा सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेने संबंधितांना दिलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

डी.एल.एच विकासकाने ११ वा रोड, खार (प), मुंबई येथे एअरपोर्ट ऑथोरिटीचे बनावट ना हरकत प्रमाणपत्र देउन केलेले अनधिकृत बांधकाम

u

(५४) * **u३५४४४ uuश्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डी.एल.एचच विकासकाने ११ वा रोड, खार (प), मुंबई येथे एअरपोर्ट ऑथोरिटीचे बनावट ना हरकत प्रमाणपत्र देउन अनधिकृत १ माळा व पाण्याची टाकी बांधल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एअरपोर्ट ऑथोरिटीने ५६.२७ मीटरची परवानगी दिली असताना विकासकाने ६४.२६ मीटरचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर विकासकावर फसवणूक व अनधिकृत बांधकाम केल्या प्रकरणी काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकासक व वास्तुरचनाकार यांच्या विरोधात बांद्रा पोलीस ठाणे येथे दि. २७.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.
uuuu तसेच सदर विकासकास दिनांक ०९.११.२०१५ रोजी महाराष्ट्र नगर रचना अधिनियमाच्या कलम ५६ अन्वये वाढीव बांधकामाच्या निष्कासनाची नोटीस बजावणी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी येथील झोपडपट्टी पुर्नवसन योजना अपूर्ण असल्याबाबत

u
(५५) * u२८५१५ uuश्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी)ी:ी सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१)११इचलकरंजी शहरात एकूण २६ झोपडपट्टी घोषित करण्यात आल्या असून या झोपडपटयांच्या पुर्नवसनासाठी राज्य व केंद्र पुरस्कृत विविध योजनांमधून प्रकल्प राबविण्यात येत असलेले बहुतेक सर्व प्रकल्प रखडले आहेत, हे खरे आहे काय,
(२)२असल्यास, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (WAMBAY) या योजनेतील ९१६ घरकुले अपुर्ण आहेत. तसेच राजीव आवास योजनेची मार्गदर्शक तत्वे नसल्यामुळे प्रकल्प रखडला आहे. तर उर्वरीत झोपडपटयाचा सर्व्हे करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३)३असल्यास, उक्त झोपडपटयाच्या पुनर्वसनासाठी बैठक घेण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४)४असल्यास, उक्त झोपडपटटयांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे व झोपडपट्टी पुनर्वसनासाठी शासनाची भुमिका काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. प्रकाश मेहता : (१) इचलरंजी शहरातील २३ झोपडपट्टया महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास)स अधिनियमयातील तरतुदींनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत करण्यास मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव

इचलकरंजी नगर परिषद सभागृहासमोर विचाराधीन आहे.` तसेच सद्यस्थितीत नगर परिषद हद्दीतील झोपडट्ट्यांच्या पुनर्वसनाची कोणतीही योजना कार्यान्वित नाही.

(२) वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत एकूण मंजूर १८३७ घरकुलांपैकी ९२१ घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात येऊन त्यांचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले आहे.` उर्वरित ९१६ घरकुलांचा प्रस्ताव आयएचएसडीपी योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता. । तथापि, या प्रकल्पास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त होऊ शकली नाही.

uuuu राजीव आवास योजनेअंतर्गत शहरातील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे मंजुरीस्तव सादर करणे याकामी नगर परिषदेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. । मात्र राजीव आवास योजनेऐवजी u सर्वांसाठी घरे` ही नवीन योजना केंद्र शासनाकडून सुरु करण्यात आली आहे.` योजना राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.` सदर योजनेत इचलकरंजी या शहराचा समावेश करण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) केंद्र शासनाने राजीव आवास योजना खंडीत करुन त्याऐवजी सर्वसमावेशक अशी uप्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे` ही योजना नागरी भागासाठी लागू केली असून या योजनेमध्ये नागरी भागातील झोपडपट्ट्यांचा पुनर्वसनाबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

---

u

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस येथील ओनिडा (मिर्क इलेक्ट्रॉनिक्स) कंपनीने ७० कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी केल्याबाबत

u

(५६) * **u२९७६० uuश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर)र:र** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील कुडूस ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ओनिडा (मिर्क इलेक्ट्रॉनिक्स) कंपनी प्रशासनाने सुमारे ७० कंत्राटी कामगारांना कुठलीही पूर्वसूचना न देता तडकाफडकी कामावरुन कमी केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तद्नुसार कोणतीही पूर्वसूचना न देता ७० कामगारांना नोकरीवरुन काढणाऱ्या कंपनी प्रशासनावर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) व्यवस्थापनाने आस्थापनेतील सीआर टीव्हींचे कमी झालेले उत्पादन व आर्थिक स्थिती बिकट झाल्याच्या कारणास्तव माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये ०३ कंत्राटदारांचे कंत्राट रद्द केले व त्यामुळे १६६ कंत्राटी कामगार परिणामित झाले हे खरे आहे.
(२) होय.
(३) चौकशीअंती व्यवस्थापनाने आस्थापनेतील सीआर टीव्हींचे कमी झालेले उत्पादन व आर्थिक स्थिती बिकट झाल्याच्या कारणास्तव माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये ०३ कंत्राटदारांचे कंत्राट रद्द केले व त्यामुळे १६६ कंत्राटी कामगार परिणामित झाले आहेत. तसेच कंत्राटदाराने संबंधित कंत्राटी कामगारांना त्यांच्या कायदेशीर देण्यापोटी रुपये १,३४,५६,४८९/- इतकी रक्कम धनादेशाव्दारे अदा केली आहे.
uuuu परिणामित कंत्राटी कामगारांना कंत्राटदाराने त्यांच्या कायदेशीर देय रक्कमा अदा केल्याने व त्या त्यांनी स्विकारल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवला नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

औरंगाबाद जिल्ह्यातील गौताळा अभयारण्यातून जाणाऱ्या कन्नड-पिशोर रस्त्यावर चोरट्यांनी सहा वाहनांना लुटून केलेली मारहाण

u

(५७) * **u३४६९६ uuश्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील गौताळा अभयारण्यातून जाणाऱ्या कन्नड-पिशोर रस्त्यावर दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी रात्री पावणे अकरा ते साडे अकराच्या दरम्यान झाडे आडवी टाकून चोरट्यांनी सहा वाहनांना लुटून प्रवाशांना गंभीररित्या मारहाण केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेतून सुमारे दोन लाख रुपयांचा ऐवज लुटण्याचा अंदाज असून झालेल्या मारहाणीत एका पोलिसांसह चार जणण गंभीर जखमी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी कन्नड पोलीस ठाणे येथे अपराध क्र.१८१/२०१५, भा.दं. वि. सं. कलम ३९५, ३९७ अन्वये नोंद घेण्यात आलेली असून, गुन्ह्यामधील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून गुन्ह्यामध्ये वापरण्यात आलेले वाहन तसेच, इतर गुन्ह्यांमधील मोबाईल सह रु.१.२६.५२५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.`

(४) या मार्गावर भविष्यात अशा घटना घडू नयेत याकरीता सदर मार्गावर सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात आली आहे. वेळोवेळी अचानक नाकाबंदी करण्यात येऊन सर्व वाहनांची व कागदपत्रांची तपासणी केली जाते, तसेच या मार्गावर पेट्रोलिंग करण्यात येत असून पोलीस मित्र मंडळाची गस्तकामी मदत घेण्यात येते.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या अस्तित्वात नसलेल्या तुकड्यांसाठी कोटयावधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आल्याबाबत

(५८) * u२८७८४ uuश्री.छगन भुजबळ (येवला), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) I: I सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या (आयटीआय) अस्तित्वात नसलेल्या तुकड्यांसाठी कोटयावधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी केली असून यातील ३४ टक्के यंत्रसामुग्री विनावापर पडून असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या संचालकांच्या कालावधीमध्ये अनियमितता झाली त्यांच्याकडून लेखा व सेवाविषयक कार्यभार काढून घेलेलेला असूनही त्यांच्याकडेच पुन्हा दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी हा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी uशासनाने uदिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी चौकशी समितीची नेमणूक केली असून चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी अहवालातील uनिष्कर्षानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे नाही.

(३) खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

भाडेकरु हक्क हस्तांतर करण्यास मनाई नसल्याबाबत

u

(५९) * u३०७९६ uu**श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी)**ी:ी सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) दक्षिण मुंबईतील एका समूह विकासाच्या प्रस्तावावर महानगरपालिकेने ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविले असताना भाडेकरु हक्क हस्तांतर करण्यास दिनांक १३ जून, १९९६ नंतरही मनाई नाही असा कायदेशीर अभिप्राय राज्य शासनाच्या प्रभारी ॲडव्होकेट जनरल आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये` शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासन व महापालिकेने त्याची अंमलबजावणी केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊन मुंबईतील चाळी किंवा जुन्या घरातील स्थानिक मराठी मुंबईबाहेरर जाण्याची व काही रक्कम देऊन किंवा धाक दाखवून जुन्या भाडेकरुंना चाळीतून किंवा जुन्या घरातून पिटाळून लावून त्यांच्या पुनर्वसनासाठी चटईक्षेत्र निर्देशांकाचा (एफएसआय) लाभ लाटण्याचे उद्योग त्यातून सुरु होणार व चाळीतील किंवा जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या जागेवर मूळ भाडेकरुंचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने विकासकांना जादा एफएसआयचा लाभ देण्याच्या शासनाच्या मूळ योजनेतील उद्दिष्टांनाच हरताळ फासला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मुंबई शहरातील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीतील व चाळीतील रहिवाश्यांचे पुनर्वसन करताना संरक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन मूळ जागीच करण्यात येईल असा निर्णय मा.मुख्यमंत्र्यांनी घेतलेला असल्याने ॲडव्होकेट जनरल यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) मुंबई शहरातील एफ/दक्षिण विभागातील भूखंड क्र. ७७ परेल शिवडी विभाग या भूखंडावर विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (९) अंतर्गत प्रस्ताव शासनाद्वारे गठीत उच्च स्तरीय समितीद्वारे सुधारित नियमावली अंतर्गत मंजुरीस्तव ठेवण्यास आला असता समितीच्या सुचनेच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने भाडेकरु हक्क हस्तांतरणासंदर्भात अभिप्राय मागविण्यात आले. त्यासंदर्भात दिनांक १५ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये, ॲडीशिनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया व तत्कालीन इनजार्ज ॲडव्होकेट जनरल ऑफ महाराष्ट्र यांनी भाडेदारी दि. १३ जून, १९९६ पूर्वी निर्माण झाली असणे आवश्यक आहे. मात्र भाडेदारी हस्तांतरण गृहनिर्माण संस्था स्थापनेपर्यंतच होवू शकेल असे अभिमत दिले आहे.

(२) व (३) यापूर्वी भाडेदारी हक्क हस्तांतरणासंदर्भात तत्कालीन महाअधिवक्ता यांनी दिलेले अभिमत, राज्य शासनाचे धोरण व उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. १४८२/२०१५ मधील न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने विकास नियंत्रण नियमावली

३३ (७) अंतर्गतच्या योजनांवरील होणाऱ्या दूरगामी परिणामाच्या संदर्भात विधी व न्याय विभागामार्फत सध्याच्या महाअधिवक्ता यांच्याकडून पुन:अभिप्राय अपेक्षिलेले आहेत.

---

u

मुंबई महानगरपालिकेने आठवीच्या विद्यार्थ्यांना टॅब देण्याच्या निर्णयाबाबत

u

(६०) * u२९६८६ uuश्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव)व:व सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी यंदा आठवीच्या विद्यार्थ्यांना टॅब देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे, याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्या वैधानिक शिक्षण समितीकडून मंजूर करुन घेण्यात आला, मात्र आजवर टॅबमधील अभ्यासक्रमाबाबत आणि इतर ॲप्सच्या समावेशाबाबत समिती सदस्यांना विश्वासात घेतले नसल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच विद्यार्थ्यांना टॅब वाटपात २३९ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट,२०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

uuuuu टॅबच्या अभ्यासक्रमाबाबत विषयनिहाय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीकडून पाठयक्रमाची पडताळणी करुन घेऊनच पाठयक्रमाचा समावेश टॅबमध्ये करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) शहरात पाणीटंचाई व दूषित पाणीपुरवठ्याबाबत

(६१) * u३८०४७ uuश्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली)ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण (पूर्व) (जि. ठाणे) शहरातील नागरिकांना वर्षानुवर्षे पाणीटंचाईई व दूषित पाणी पुरवठ्याच्या भीषण समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही ी दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४)४ नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

राज्यातील पुणे, ठाणे, मुंबई आदि शहरांमध्ये डिम्ड कन्व्हेंअन्स करताना भोगवटा प्रमाणपत्राची अट सक्तीची न करण्याबाबत

u

(६२) * u३२२७७ uuश्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात तसेच ठाणे, मुंबई आदि शहरांमध्ये डिम्ड कन्व्हेंअन्स करताना भोगवटा प्रमाणपत्राची अट सक्तीची करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अटीमुळे उपरोक्त शहरामधील गृहनिर्माण संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र मिळत नसल्याचे माहे जुलै ते नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अनेक प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तथापी भोगवटा प्रमाणपत्र घेणे ही विकासकाची जबाबदारी असताना गृहनिर्माण संस्थेकडे सक्ती करु नये अशी गृहनिर्माण संस्था फेडरेशनने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) शासनाच्या दि. २५.०२.२०११ च्या शासन निर्णयान्वये

मानीव अभिहस्तांरण अर्जासोबत दाखल करावयाच्या कागदपत्रांची यादी देतांना त्यामध्ये भोगवटा प्रमाणपत्राचा समावेश आहे. परंतु, सदर शासन निर्णयान्वये नमुद केलेल्या कागदपत्रांमध्ये शक्य तितकी कागदपत्रे सादर करावीत अशा सूचना दिल्या आहेत.

(२) ते (५) डिम्ड कन्वहेंअसच्या प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्राची मागणी करण्यात येवू नये, अशा आशयाचे काही गृहनिर्माण संस्था, लोकप्रतिनिधी व व्यक्तींचे अर्ज या विभागात प्राप्त झाले आहेत.

डिम्ड कन्व्हेंअस प्रकरणी सहकार विभागांतर्गत एक समिती स्थापन करण्यात आली असून त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाव्दारे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

ठाणे जिल्हयातील कळवा येथील बंद असलेल्या मफतलाल कंपनीतील कामगारांची देणी मिळण्याबाबत

u

(६३) * u३२३०० uu**श्री.सुनिल राऊत (विक्रोळी)**ी:ी सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ठाणे जिल्हयातील कळवा येथील मफतलाल कंपनीला सन १९८९ मध्ये टाळे लागले असूनन कंपनीने कामगारांची देणी दिलेली नाहीत तसेच बॅकेचे कर्जही फेडले नाही. कामागाराची देणी कंपनीच्या मालकीची जमिन विकून अदा करावीत असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. मात्र ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर जमिन शासनाकडे जमा करण्याचा आदेश दिल्याने कामगारांनी सामुहिक आत्मदहनांचा इशारा दिला असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांची असलेली देणी लवकरात लवकर कामगारांना मिळावी यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येततआहे,

(३) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१) ठाणे जिल्ह्यातील कळवा येथील मे.मफतलाल इंजिनिअरिंग लि. कंपनी दिनांक २७/०७/१९८९ पासून बंद आहे व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मालमत्ता अवसायक व कोर्ट रिसीव्हर यांच्या ताब्यात सन १९९९ पासून देण्यात आलेली आहे.` आस्थापनेच्या मालमत्तेची कोर्ट रिसिव्हर कडून विक्री झाल्यावर कामगारांना त्यांची प्रलंबित थकित देणी अदा करणे अवसायक यांना शक्य होणार आहे.` अवसायक यांनी दिलेल्या माहितीनुसार सेक्युअर्ड क्रेडीटर यांच्या (१) पंजाब नॅशनल बँक, (२) स्टेट बँक ऑफ इंडिया, (३) आय.आय.बी.आय., (४) आय.डी.बी.आय., (५) आय.एफ.सी.आय., (६) कोटक महिन्द्रा बँक, (७) आय.सी.आय.सी.आय. बँक

यांनी दाखल केलेल्या दाव्यांची एकूण रक्कम रु. १६५,४१,२८,१०७/- एवढी आहे.

uuuuuu शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय कंपनीने जमिन बँकेकडे गहाण ठेवल्याबद्दल उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे दिनांक २१/०८/२०१५ च्या आदेशान्वये मे.मफतलाल इंजिनिअरींग इंडस्ट्रीज प्रा.लि. यांचे नांवे असलेली सदर आदेशात नमूद मिळकत शासन जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र मा.उच्च न्यायालयाने कंपनी पिटीशन क्रमांक ७४३/१९९० मधील OLR No.५३४ of २०१५ / LIQN.VIII दिनांक १६/१०/२०१५ रोजी आदेश पारीत केलेले असून सदर आदेशानुसार उप विभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडील शर्तभंग प्रकरणांचे आदेशास स्थगिती देऊन कंपनीचे नाव संबंधित जमिनी व पुन्हा दाखल करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.त मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पारीत केलेल्या आदेशानुसार मूळ अधिकार अभिलेखात मे.मफतलाल इंजिनिअरींग इंडस्ट्रीज लि. यांचे नाव दाखल करण्यात आलेले आहे.

uuu दिनांक २५/०८/२०१५ च्या महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रात कामगारांनी सामुहिक आत्मदहनाचा इशारा दिल्याचे वृत प्रसिध्द झाले आहे.

(२) आस्थापनेच्या मालमत्तेची मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या कोर्ट रिसीव्हर कडून विक्री झाल्यानंतर कामगारांना त्यांची प्रलंबित थकीत देणी अदा करणे अवसायक यांना शक्य होणार आहे.

uuu अवसायक (Official Liquidator) यांच्याकडून प्राप्त झालेल्या तपशिलानुसार त्यांचेकडे ३,०३३ कामगारांचे व अन्य धनकोंचे रु.१९५,५८,४३,१४९/- चे दावे प्राप्त झाले आहेत. उक्त दाव्यांची छाननी करण्याकरीता अवसायकाने तीन चार्टर्ड अकाऊंटंट्स नेमून आतापर्यंत २,८३२ कामगारांचे दावे दाखल करुन घेतले असून ज्यांची रक्कम रु. १४८,५७,३३,०१४/- इतकी आहे.`

uuuuuu तसेच अवसायकाने प्रथम ४ % दराने व तद्नंतर ३ % दराने सुमारे २,४८९ कामगारांना रुपये ५,१०,३७,६३७/- एवढा लाभांश दिला आहे. अंतिम कायदेशीर देणी देण्याची कायदेशीर प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाचे अवसायक यांचे स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

विरार (जि.पालघर) येथील आदिवासींच्या जमिनीवर विकासकांचे अनधिकृत बांधकाम

u

(६४) * **u२८४०४ uuश्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)ी:ी** सन्माननीय

मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) विरार (जि.पालघर) पूर्वे कडील सर्व्हे नं.८६, हिस्सा नं.१/२, १/५ आणि १/१२ या आदिवासींच्या मालकीच्या जागेवर खाजगी विकासकांनी अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी पालिका उपायुक्त यांचेकडे दि.१८ एप्रिल, २०१५ रोजी व १६ मे, २०१५ रोजी तक्रार करुनही कोणतीच कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकाम न तोडता, इमारतीचा काही भागच तोडण्याचा दिखावा करुन बांधकाम तोडण्यास आलेला रु.२ लाख ९९ हजार २५० इतका खर्च तक्रारदाराने देण्याची नोटीस दि.४ जुलै, २०१५ रोजी पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महानगरपालिकेच्या अधिकारी व विकासकांवर कोणती कारवाई केली आहे व अनधिकृत बांधकामे तोडण्यात आली आहे काय,
(४) अद्याप अनधिकृत बांधकामे तोडली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
uuuu विरार येथील सर्व्हे क्र. ८६ हिस्सा नं. १/२, १/५, आणि १/१२ या आदिवासीच्या मालकीच्या जमिनीवर खालीलप्रमाणे अनधिकृत बांधकामे आहेत:-

- तळमजला + ४ एकूण २६ इमारती
- बैठी स्वरुपाची पत्र्याची चाळी २८
- तबेले ०३
- स्वतंत्र घरे १२

uuuuu वसई विरार शहर महानगरपालिकेने चार नवीन (आर.सी.सी) अनाधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केलेली आहे. उर्वरीत अनधिकृत बांधकामाना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(२) अनधिकृत बांधकाम न तोडता खर्च देण्याची नोटीस पाठविली हे खरे नाही.
दिनांक २४.७.२०१५ रोजी महानगरपालिकेने निष्कासनाच्या खर्चापोटी रुपये २,९९,२५०/- भरणा करण्याबाबत जमिन मालकास कळविले आहे.
(३) विरार (जि. पालघर) पूर्वे कडील सर्वे नं. ८६ हिस्सा नं. १/२, १/५ व १/१२ वरील सर्व अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आलेले आहेत.
(४) काही अनधिकृत बांधकामे ही रहिवास वापर असलेली असून इतर काही बांधकामे जुनी आहेत. या सर्व अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना । अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेने हर्सूल गावातील ८ एकरातील बांधकाम प्रकल्पाच्या ले आऊटला मंजुरी दिलेबाबत

u

(६५) * **u२९०११ uuश्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)१औरंगाबाद महानगरपालिकेने सन २०११ मध्ये हर्सूल गावातील ८ एकरातील बांधकाम प्रकल्पाच्या ले आऊट ला मंजुरी दिल्यानंतर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेही प्रमाणपत्र मिळाल्यानंतर जमीन धारकांनी प्लॉट पाडून, प्लॉटची विक्री केल्यानंतर औरंगाबाद मनपाने सन २०१४-१५ या वर्षात सदर प्लॉट विकत घेणाऱ्यानां घरे बांधण्यासाठी परवानगी दिली व ले आऊट मंजूर केले हे खरे आहे काय,

(२)२असल्यास, सदर बांधकामाना जेल प्रशासनाने आक्षेप घेतल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने सदर प्लॉट वरील बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई सुरु केली, हे ही खरे आहे काय,

(३)३असल्यास, महानगरपालिकेने दिलेल्या मंजुरीनुसार प्लॉट विकत घेऊन बांधकाम करणाऱ्या मालकांना विरोध करण्याची कारणे काय,

(४) असल्यास, सदर प्लॉट मालकांना बांधकामास शाश्वतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

uuuu मौ.हर्सुल येथील सर्व्हे क्र. २०१ साठी महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/नरवि/ससंनर/१८६७/२०११ रेखांकन क्र. २४५, दि.१९/९/२०११ अन्वये रेखांकनास अंतिम मंजूरी प्रदान केलेली आहे. या रेखांकनात विविध क्षेत्रफळाचे एकूण २०१ भूखंउ प्रस्तावित असून त्यापैकी सन २०११-१५ या कालावधीत एकूण ४७ भूखंडांना महानगरपालिकेने वेळोवेळी बांधकाम परवानगी दिलेली आहे.

(२) होय.

uuuuu अधिक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांनी दि.२५/५/२०१५ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर बांधकाम परवानग्या महानगरपालिकेने रद्द केल्या असून त्यापैकी सद्य:स्थितीत चालू असलेल्या दोन भूखंडावरील बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये बांधकाम स्थगित करणेविषयी नोटीस बजावलेल्या आहेत. त्याविरोधात संबंधितत दोन्ही भूखंडधारकांनी औरंगाबाद महानगरपालिका न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याच अभिन्यासातील इतर भूखंडधारकांनी मा. उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ७८०३/२०१५ दाखल केली आहे.

(३) महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण क्र. ५ मधील नियम क्र. ३ डावलून तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. ४/१२/२०१३ च्या शासन आदेशात नमुद केल्यानुसार कारागृहाच्या तटभिंतीपासून ५०० मिटरच्या आत

कोणत्याही विकास कामांना स्थायी सल्लागार समितीची परवागनी घेणे आवश्यक असतांना या निदेशांना डावलून सदर परवानग्या महानगरपालिकेने दिल्या असल्याने व सदर परवानग्या महानगरपालिकेने दिल्या असल्याने व सदर बांधकामे ही कारागृहामधील बंदयांच्या जिविताच्या दृष्टीने धोकादायक असल्याने सदर बांधकामे थांबविण्याबाबत तसेच कारागृहाच्या मुख्य तट भिंतीपासून १८२.८८ मिटर व ५०० मिटरच्या आता मध्ये दिलेल्या बांधकाम परवानग्या रद्द करण्याबाबत दि. २५/५/२०१५ च्या पत्रान्वये अधिक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस कळविलेले असल्याने महानगरपालिकेने सदरची कार्यवाही केलेली आहे.

(४) शासनाने दि. ६/८/२०१५ रोजी च्या आदेशान्वये राज्यातील अस्तित्वातील कारागृहाच्या तटभिंतीपासून १५० मिटरच्या पलिकडे ५०० मिटर अंतरापर्यत बांधकामासाठी /पुनर्विकासाठी बांधकामासाठी परवानगी देताना व १५० मिटर मध्ये मंजूर विकास कामांना परवानगी चालू ठेवताना दि. ४/१२/२०१३ रोजीच्या शासन निदेशान्वये गठित करण्यात आलेल्या स्थायी सल्लागार समितीने प्रत्येक प्रकरणात गुणवत्ता तपासून निर्णय घेणे आवश्यक असलेबाबत व याप्रमाणे निर्णय घेताना सदर समितीने विचारात घ्यावयाची मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत.

(५) लागू नाही.

औरंगाबाद शहरात मेगा सर्किट योजनेअंतर्गत सुरु करण्यात आलेली कामे बंद करण्यात आल्याबाबत

(६६) * u३३२०४ uu**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात पर्यटनाला वाव मिळावा म्हणून केंद्र शासनाने दोन वर्षापूर्वी मेगा सर्किट योजनेत औरंगाबाद शहराला २३ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून या योजनेअंतर्गत मजनू हिल येथील टेकडीवर रोझ गार्डन उभारणे, हॉटेल कार्तिकी ते भडकलगेटपर्यंत दुभाजक टाकणे आदी कोट्यवधी रुपयांची कामे सुरु करण्यात आली, परंतु आता केंद्र शासनाने ही योजनाच रद्द केली असल्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महानगरपालिका संकटात सापडली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाने प्रश्नाधीन कामांसाठी रु. २३४३.२० लक्ष मंजूरी देऊन रु. ४६८.६४ लक्ष निधी वितरीत

केला होता. उर्वरित निधीसाठी मागणी करण्यात आलेली असता केंद्र शासनाने वित्तीय वर्ष २०१५-२०१६ वर्षात या योजनेसाठी तरतूद न केल्यामुळे निधी वितरीत करता येणार नाही, असे कळविलेले आहे.
(२) व (३) केंद्रीय पर्यटनन मंत्रालयाकडे उर्वरित निधीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

u

मौजा बोर्डा (झुल्लुरवार) ता. पोंभूर्णा (जि.चंद्रपूर)) येथील मोहफुलाचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांकडून लाच घेतांना केळझर वन क्षेत्र सहायकास पकडल्याबाबत

u

(६७) * **u३५०६३ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मौजा बोर्डा (झुल्लुरवार) ता. पोंभूर्णा (जि.चंद्रपूर)) येथील मोहफुलाचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांकडून १० हजार रुपयांची लाच घेतांना केळझर वन क्षेत्र सहायकास दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास चंद्रपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) व (३) शेतकऱ्याकडून मोहफुल खरेदी करुन इतर व्यापाऱ्यांना विक्री करण्याच्या व्यवसायाची अनुमती देण्याकरिता तक्रारदार श्री. हिमतलाल मांडवगडे यांचेकडून रुपये १०,०००/- एवढ्या लाचेची मागणी करुन रुपये ७,०००/- एवढी लाचेची रक्कम स्विकारल्याने श्री.विदेश कुमार गलगट, क्षेत्र सहायक, केळझर यांचेविरुध्द गु.र.क्र. ३०३४/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७,१३(१)(ड) व १३ (२) अन्वये दि.०३.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपी लोकसेवकांविरुध्द मा. न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर, वनवृत्त चंद्रपूर यांच्या मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

---

u

उस्मानाबाद नगरपालिकेत रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरे मिळणेबाबत

u

(६८) * **u३५६२६ uuश्री.बसवराज पाटील (औसा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(१) उस्मानाबाद नगरपालिका क्षेत्रात असलेल्या गरीबांच्या राहणीमानाचा दर्जा वाढावा यासाठी शासनाने रमाई घरकुल योजना सुरू केली असून, सदरहू योजनेंतर्गत उस्मानाबाद नगरपालिका क्षेत्रातील या योजनेंतर्गत २३७ नागरीकांना घरकुल देण्यासाठी सन २००६-२००७ मध्ये तब्बल ९ कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) उस्मानाबाद नगरपालिकेला शासनाकडून आवश्यक तो निधी प्राप्त झालेला असतानाही, अद्यापी रमाई घरकुल योजनेंतर्गत असलेल्या लाभार्थ्यांना घरे बांधून देण्यात आलेली नसल्यामुळे मागील सुमारे १० वर्षापासून घरकुलासाठी प्राप्त झालेला निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास समाज कल्याण विभागानेही १०० नागरीकांची यादी उस्मानाबाद नगरपालिकेकडे पाठविलेली असतानाही तसेच एकूण तब्बल २३७ नागरीकांना घरकुल देण्याबाबतचा प्रस्ताव असतानाही आजमितीस सदरहू निधी पडून असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उस्मानाबाद नगरपालिका हद्दीत राहणा-या लाभार्थी गोरगरीब नागरीकांना रमाई घरकुल योजनेंतर्गत विनाविलंब घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) रमाई घरकुल योजनेंतर्गत उस्मानाबाद नगरपालिकेस सन २०१०-११ व सन २०११-१२ या आर्थिक वर्षात एकूण रु. १०,७२,९५,०००/- एवढा निधी प्राप्त झाला आहे.
(२) सन २०१०-११ पासून या योजनेंतर्गत नगरपालिकेस प्राप्त झालेला निधी अखर्चित असल्याची बाब खरी आहे.
(३) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने शासन निर्णय, दि. १५ नोव्हेंबर, २००८ अन्वये विहित केलेल्या धोरणानुसार सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याच्या स्वत:च्या नावावर जागा असणे आवश्यक आहे.
uuuuu तथापि, उस्मानाबाद नगरपालिकेच्या यादीतील लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा उपलब्ध नाही. परिणामी हा निधी अखर्चित राहिला आहे.
(४) व (५) अन्य एका प्रकरणी सोलापूर महानगरपालिकेने ७/१२ ची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागास सादर केला असून त्या विभागाकडून उक्त प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

मुंबईतील दहिसर पूर्व येथील रमाणी कम्पाऊंडमध्ये शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामाबाबत

u
(६९) * **u३२०६८ uuश्री.सरदार तारासिंह (मुलुंड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(१)१ दहिसर (पू.) येथील रमाणी कम्पाऊंड मध्ये करण्यात आलेली सर्व बांधकामे शासकीय जमिनीवर अनधिकृतपणे करण्यात आल्याच्या तक्रारी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास, आरपीआय च्या बंगाली सेलचे मुंबई अध्यक्ष श्री.पंकज विश्वास यांनी मा.मुख्यमंत्री तसेच महानगरपालिका आयुक्त यांचेकडे पुराव्यासह सादर केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत गाळे तोडण्यासाठी महानगरपालिकेने यापूर्वी नोटीसही दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्वीचे उपायुक्त श्री.रणजित ढाकणे यांनी ३५ अनधिकृत गाळेधारकांविरोधात एमआरटीपी अंतर्गत गुन्हे दाखल केले होते, परंतु विद्यमान महानगरपालिका उपायुक्त श्री.अशोक खैरे हे रमाणी कम्पाऊंड मधील भूमाफियांना मदत करत असल्याची तक्रारी करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,यययययययययययययययययययययययययययय
(४) असल्यास, अतिक्रमण करणाऱ्या भूमाफिया तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या । महानगरपालिकेच्या । अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच कारवाईस हेतूत: विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, uu
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
uuuuuu सदर जागेवरील अनधिकृत ३८ व्यावसायिक गाळयांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगरचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अन्वेय नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(३) पूर्वीच्या उपायुक्तांनी किंवा महापालिकेच्या अन्य अधिकाऱ्यांमार्फत ३५ अनधिकृत गाळेधारकांविरोधात एम.आर.टी.पी. अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत.
uuuuuu तसेच विद्यमान उपायुक्त हे रमाणी कंपाऊंडमधील भूमाफियांना मदत करत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या असल्याचे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चंदपूर महानगरपालिकेत विविध कामांमध्ये करोडो रूपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबत

u
(७०) * **u३८१८५ uuश्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी)ी:ी** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदपूर महानगरपालिकेने डीआरए कंसल्टंट कंपनीला शहारामध्ये प्रत्यक्षात

घरोघरी जाऊन नळ जोडणीचे सर्व्हेक्षण करण्याचे काम दिले असता सदर कंपनीने घरोघरी न जाता। बोगसस अहवाल कागदोपत्री तयार करून गेल्या पंधरा वर्षात फक्त तीन हजार नळ जोडणी वाढल्याची चुकीची माहिती देवून महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने उज्वल कंस्ट्रक्शन कंपनीला। चंद्रपूर शहरातील योग्य पाणी पुरवठा करण्याचे आणि नळ योजने करीता पाईप लाईन टाकण्याचे काम दिल्यानंतरर सदर कंपनीने कमी दर्जाचे पाईप टाकल्यामुळे अनेक ठिकाणी पाणी पोहचत नसून योग्य पाणी पुरवठा होत नसल्यामुळे करोडो रूपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, चंद्रपूर महानगरपालिकेने करोडो रूपये खर्च करुनन शहारातील कच-याची साफसफाई करण्याचे काम कंत्राटदाराला दिल्यानंतर सुध्दा ठिकठिकाणी मोठया प्रमाणात कचरा पडलेला असून कच-याची विल्हेवाट लावल्याचे बोगस अहवाल देवून कंपनीने लाखो रूपयाची उचल केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या। प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्रस्तुत प्रकरणी कंपनीमार्फत सर्व्हेक्षण सुरु असून, अंतीम अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(२) चंद्रपूर महानगरपालिका व संबंधीत कंपनी यांच्यात झालेल्या करारनाम्यानुसार महानगरपालिका निदेश देईल त्या ठिकाणी दर वर्षी १.५ कि.मी. लांबीची नविन पाईपलाईन संबंधीत कंपनीने टाकणे आवश्यक आहे.

नविन टाकण्यात आलेल्या पाईपलाईनच्या दर्जाची तपासणी महानगरपालिकेकडून केली जाते. कंपनीने करारनाम्यानुसार आतापर्यत टाकलेल्या पाईप लाईनच्या दर्जाच्या तपासणीअंती कंपनीने टाकलेली पाईपलाईन कमी दर्जाची नसल्याची खात्री महानगरपालिकेने केली आहे.

uuuu तथापि, शहरातील पाणीपुरवठा योजना जुनी तसेच वितरण व्यवस्था अपूरी असल्यामुळे शहरात काही भागात आवश्यक प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. अशी वस्तुस्थिती असली तरी, करोडो रुपयांचा गेरव्यवहार झाला असे म्हणता येणार नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिकेच्या प्रभाग १ मधील स्मशान भूमीबाबत

u

(७१) * **u३२९५६ uuडॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव)व:व** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(१) ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील खाजगी विकासकाच्या इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यात स्मशान भूमी येत असल्याने ती ॲमिनिटी प्लॉटवर स्थलांतरीत करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मशानभूमीचे स्थलांतर दुसरीकडे करण्यास या परिसरातील नागरिकांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे महानगरपालिकेचा विकास आराखडा सन १९९९ मध्ये मंजूर करण्यात आलेला आहे.
uuuu मंजूर विकास आराखडयातील सेक्टर क्र. ६ मधील मौजे कासारवडवली येथील अस्तित्वात असलेली स्मशानभुमी २० मी. रुंदीच्या रस्त्याने बाधित झालेली आहे.
uuuu सदर अस्तित्वात असलेल्या स्मशानभुमीमुळे काही निवासी भाग हा मुख्य रस्त्याशी जोडला लावु शकत नसल्यामुळे स्मशानभूमी नजीकच्या भूखंडावर स्थलांतरीत करण्याचा निर्णय ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या विचाराधिन आहे.
(२) होय, विकास आराखडा क्र. २०००/१२९ मधील कृष्णा ग्रीनलॅण्ड को. ऑप. हौ. सोसायटी या संस्थेच्या सभासदांनी स्मशानभुमी स्थलांतरण करण्यास विरोध दर्शविला आहे.
(३) सदर रस्ता विकसित करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३२३ मधील तरतुदीनुसार अस्तित्वातील स्मशानीभुमी बंद करण्याकरीता व ३२१ मधील तरतुदीनुसार सुविधा भूखंडावर नव्याने स्मशानभूमी प्रस्तावित करणेकरिता महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

uuuuu महासभेने प्रस्ताव संमत केल्यास सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मुंबईतील ताज हॉटेलने फुटपाथवर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी आकारलेल्या दंडाबाबत

(७२) * u२९३८२ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड)ड:ड सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) मुंबईतील ताज हॉटेलने फुटपाथवर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी आकारलेला ७ कोटी रुपयांचा दंड अद्याप पालिकेला भरला नसतानाही ताज हॉटेलच्या नविन इमारतीचे प्लॉस्टर, रंगकाम हे पालिकेची परवानगी न घेता फक्त हेरिटेजची परवानगी घेऊन सुरु करण्यात आले असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच दंड वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय,
(२) होय, सदर प्रकरणात महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त (इमारत व कारखाने) ए विभाग यांच्यातर्फे सदर जागेची पाहणी करुन चौकशी केली आहे. uuuu सदर चौकशीमध्ये, मे. इंडियन हॉटेल कंपनी लिमिटेड यांनी ताज महाल हॉटेलच्या इमारतीच्या प्लास्टर, रंगकाम आणि वॉटर प्रुफींग कामाकरीता उप महापालिका वास्तुशास्त्रज्ञ (विकास नियोजन)/ हेरीटेजची परवानगी दिनांक ०२.०१.२०१५ रोजी घेतल आहे. तसेच सदर काम हे टेनेंटेबल रिपेअर या सदरात मोडत असल्याने त्यास मुंबई महानगरपालिकेमार्फत इतर कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असे आढळून आले.

हॉटेल ताजमहल पॅलेस सभोवताली रस्ते पदपथावर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ठेवण्यात आलेल्या बॅरीकेड्स व कुंड्यासाठी आकरण्यात आलेले शुल्क भरणा करुन घेण्यासाठी व पदपथ पादचाऱ्यांच्या रहदारीकरीता खुला करण्याबाबत मे.ताजमहल हॉटेल यांना महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी लेखी व तोंडी कळविण्यात आले आहे.
uuuu दंड वसुल करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, कोपरखैरणे, तुर्भे, ऐरोली व नेरूळ येथील रुग्णालयातील यांत्रिकी साफ सफाईचे कामाबाबत

u

(७३) * **u२८८०९ uuडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ)थ:थ** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, कोपरखैरणे, तुर्भे, ऐरोली व नेरूळ येथील रुग्णालयातील यांत्रिकी साफ सफाईचे कामे करणाऱ्या बी व्ही जी या बड्या कंपनीला सन २००६ पासून निविदा न मागविता नवी मुंबई

महानगरपालिकेच्या आयुक्तांनी स्वतः च्या अधिकारात कामे देऊन नियमबाह्य दोन कोटीचा अधिक निधी वापरला असल्याची तक्रार महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेवकाने शासनाच्या नगरविकास विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये करून याप्रकरणी चौकशी करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००६ पासून आतापर्यंत बी व्ही जी या कंपनीलाच निविदा न काढता कामे देणाऱ्या आयुक्तांची शासनाने तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
uuuu तथापि श्री.समीर बागवान, शिवसेना शाखा प्रमुख, नेरुळ, नवी मुंबई यांनी ी नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील यांत्रिकी सफाई कंत्राटच्या अनियमित कारभाराबाबत अशा आशयाचे दि. ३१/०८/२०१५ चे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदय यांना सादर केले होते.

(२) यासंदर्भात आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, नेरुळ, तुर्भे, कोरपरखैरणे व ऐरोली येथील रुग्णालयांचे यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे काम महानगरपालिकेकडून सन २००५ मध्ये निविदा मागवून मे.बी.व्ही.जी. इंडिया लिमिटेड यांना प्रथमत: ५ वर्षाकरीता देण्यात आले होते.
uuuu तद्नंतर नव्याने निविदा प्रक्रिया न करता हे काम सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देऊन उक्त कंपनीस देण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

मुंबईतील धारावीमधील राजर्षी शाहू नगरपालिका शाळेच्या पुनर्बांधणीबाबत

u

(७४) * **u२८८३६ uuअॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम)म:म** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील धारावीमधील राजर्षी शाहू नगरपालिका शाळा दुरुस्तीच्या नावाखाली जमीनदोस्त करून आज दोन वर्ष होऊन सुद्धा अद्याप ती पुन्हा बांधण्यात न आल्याने विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी पायपीठ करत दूरच्या शाळांमध्ये जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या जागेचा वापर परिसरातील नागरिक पापड आणि कपडे वाळत घालण्यासाठी करत आहेत तसेच रात्रीच्या वेळेस अंधाराचा फायदा घेत

काही लोक तेथे मद्यपान व जुगार खेळत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारत पुनर्बांधणीसाठी धारावी पुनर्वसन प्रकल्पाकडून परवानगी मिळत नसल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, अशा दुरुस्तीच्या नावाखाली जमीनदोस्त करण्यात आलेल्या पालिका शाळांच्या पुनर्बांधणीसाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहेत काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे. सदर राजर्षी शाहू शाळा। धोकादायक स्थितीतत असल्यामुळे पुनर्बाधणीकरिता सदर शाळा निष्कासित करण्यात आली असून शाळेतील विद्यार्थ्यांची नजीकच्या माटुंगा लेबर कॅम्प १, माटुंगा लेबर कॅम्प २, माटुंगा लेबर कॅम्प कन्नड शाळा क्र. ३, संत कक्क्या मनपा शाळा, न्यु माहिम मनपा शाळा व माहिम मोरी मनपा शाळा येथे व्यवस्था करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) धारावी पुनर्वसन प्रकल्पाने महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० चे पोटकलम ३ (डी) नुसार धारावीच्या अधिसूचित क्षेत्राचे विकास विषयक प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर केले आहेत.
uuuuu त्यानुसार नियोजन प्रस्तावांना तत्यत: मान्यता देण्यात आली असून अंतिम मान्यतेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

u

महागांव (ता.जि. सातारा) येथे दारोडेखोरांनी ऐवज लुटून एका महिलेवर सामुहिक बलात्कार केल्याबाबत

u
(७५) * u३१०७० uu**श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) महागांव (ता.जि. सातारा)। येथे दरोडा टाकून दारोडेखोरांनी सुमारे १४ हजार रुपयांचा ऐवज लुटून एका महिलेवर सामुहिक बलात्कार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेचा तपास करण्यात आला आहे काय, तपासात काय

आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाणे येथे दि. ११/०९/२०१५ रोजी गु.र.नं. ४४५/२०१५, भा.दं.वि. कलम ३७६ (डी). ३९५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) दाखल गुन्ह्यात एकूण ६६ आरोपी निष्पन्न झाले असून त्यासर्व आरोपींना दि. १९/०९/२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे. चोरी गेलेल्या एकूण रु. १५५५०/- च्या मुद्देमालापैकी रु. १४०५०/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सद्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

u

चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांकडून एचबीएन कंपनीने सुमारे ८ कोटी रुपये गोळा करुन पलायन केल्याबाबत

u

(७६) * **u३५०८३ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा) I: I** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) चंद्रपूर शहरातील एचबीएन कंपनीने चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांकडून सुमारे ८ कोटी रुपये गोळा करुन पलायन केल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) प्रश्नात नमूद कंपनीने नमूद परिसरात सुमारे रुपये १२ ते १३ कोटी रक्कम गुंतवणुकदाराकडून जमा करुन अभिवचन दिल्याप्रमाणे रक्कम परत केली नाही. म्हणून रामनगर पोलीस स्टेशन चंद्रपूर येथे गु.र.नं. ४४१/१५ भा.दं.वि.क ४२०, ३४, सह महाराष्ट्र ठेविदाराचे हिसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९, कलम ३ तसेच मनी लॉंडरिंग ॲक्ट २००१ कलम ४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(३) दाखल गुन्ह्याच्या तपासात सदर कंपनीविरुध्द छत्तीसगड राज्यात गुन्हा नोंद असून कंपनीच्या मॅनेजींग डायरेक्टर यांना अटक करण्यात आले आहे. गुन्हा

दाखल असून सदर गुन्ह्यात कंपनीचे` मॅनेजीग डायरेक्टर अमनदिप सिंग सरल हयांना अटक करण्यात आली असून रायपूर जेल मध्ये एम.सी.आर.वर आहेत. मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रायपूर यांना सदर आरोपीस प्रोडक्शन वॉरेन्टवर देण्यासाठी मा.सी.जे.एम.सा कोर्ट चंद्रपूर यांनी दि. २९/०९/२०१५ ला विनंती पत्र दिले. परंतू आजपावेतो आरोपीस चंद्रपूर कोर्टात पेश करण्या करीता देण्यात आले नाही. तरीपण सदर आरोपी अमनदिप सिंग सरन यास प्रोडक्शन वॉरंन्टवर आणून अटक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर ६ फरारी आरोपींना अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका एमआयडीसीकडून होत असलेला वाढीव पाणी पुरवठ्याबाबत

u

(७७) * **u३२०७३ uuश्री.सरदार तारासिंह (मुलुंड)ड:ड** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मिरा-भाईंदर म.न.पा.ला एमआयडीसीकडून ७५ एमएलडी वाढीव पाणी पुरवठा होण्याकरिता टाकण्यात येणाऱ्या पाईप लाईन करिता वन विभागाची परवानगी न घेता सुरु केल्याने वन विभागाने, वन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी मिरा-भाईंदर म.न.पा.चे आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याच्या लेखी सूचना दिल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरा-भाईंदर म.न.पा.ने सदर पाईप लाईनची कंत्राटे १५ ते २० अधिक टक्के दराने काढली असून कंत्राटात १५९० मिली मीटर व्यासाच्या पाईप लाईनची नोंद असताना एमआयडीसीने १८०० मिली मीटर व्यासाच्या पाईप लाईन टाकण्याच्या अटीवर निविदा मंजुर केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाईप लाईनची देखभाल व हंस्तातरणाबाबत मनपा व एमआयडीसी मध्ये कोणताही करार झालेला नसताना तसेच १८०० मिली मीटर व्यासाच्या पाईप लाईनला आयआयटी पवई कडून तांत्रिक मान्यता मिळाली नसताना सदर काम सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, त्यानुसार सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता मिरा-भाईंदर म.न.पा.ने विविध खात्यांकडून केंव्हा करुन घेतली व पुर्तता होण्याआधी मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

uuuu मिरा-भाईदर शहरासाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर

करण्यात आलेल्या ७५ द.ल.ली पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत वन विभागात येत असलेल्या जलवाहिन्यांसाठी काही भागाकरीता वन विभागाची अंशत: परवानगी मिळाली असून उर्वरित भागाकरिता । परवानगी मिळविण्याबाबत महानगरपालिका प्रयत्नशील आहे.

(२) या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया ई-टेंडरिंग पध्दतीने करण्यात आली आहे. त्यानुसार या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या १५९० मि.ली. व्यासाच्या जलवाहिन्यांकरिता निविदा काढण्यात आल्या आहेत. मात्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात टाकावयाच्या जलवाहिनीच्या एकूण १२ कि.मी. लांबीपैकी सुरुवातीच्या ३.२ कि.मी. लांबीसाठी १८०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीची मागणी महामंडळाकडून करण्यात आली आहे व यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येणार आहे.

(३) नाही.

uuuuu जलवाहिन्या देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून हस्तांतरीत करण्याबाबतचा करार, योजनेचे काम पूर्ण झ ाल्यानंतर महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.

uuuuu या प्रकल्पांतर्गत आवश्यक असणाऱ्या १५९० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीस आय.आय.टी., मुंबईने तांत्रिक मान्यता दिली आहे.

uuuuuu मात्र बारवी धरणातून भाविष्यात जादा पाणी उपलब्ध होणार असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भागात टाकावयाच्या जलवाहिनीच्या ३.२ कि.मी. लांबीच्या भागाकरीता १८०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीची मागणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात आली आहे. यासाठी लागणाऱ्या जादा खर्चाचे अंदाजपत्रक महानगरपालिकेने तयार करुन तसा प्रस्ताव मान्यतेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पाठविला आहे. हा प्रस्ताव महामंडळाने मान्य केल्यास १८०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीच्या प्रस्तावाबाबतचे संकल्पन व आराखडयाची तपासाणी आय.आय.टी, मुंबई यांच्याकडून करुन घेवून ते योग्य असल्याची खातरजमा केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

uuuuu या प्रकल्पाचे काम अद्याप सुरु झालेले नाही.

(४) हे खरे नाही.

uuuuu या प्रकल्पाकरीता वन विभागाने अंशत: परवानगी दिली असून उर्वरित सर्व प्राधिकरणांची आवश्यक ती कायदेशीर परवानगी प्राप्त झाली आहे. सबब, या प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता केल्यानंतरच योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

मुंबई व ठाणे जिल्हयातील ओस पडलेल्या मिठागरांच्या शेकडो एकर जमिनीवर घरे बांधण्याच्या निर्णयाबाबत

(७८) * u२८८१३ uuडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले)`:` सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) मुंबईसह राज्यात मिठागरांची ी एकूण १३ हजार एकर जमीन असूनन मुंबई व ठाणे जिल्हयातील ओस पडलेल्या मिठागरांच्या ा शेकडो एकर जमिनीचा वापर घरे बांधण्यासाठी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बृहन्मुंबई पूर्व उपनगरात ५ हजार ३७८ एकर एवढी मिठागराची जमीन असून भांडुप येथे १९३० पूर्वी या जमीनी मीठ काढण्याकरीता लिजवर दिलेल्या जमिनीची लिज संपुष्टात येत असल्याने टप्प्याटप्याने मिठागर आयुक्तांकडून या जमीनीचा ताबा राज्य शासनाला मिळणार असल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीवर गृहनिर्माण प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व अन्य विकास प्रकल्प उभारण्याचा अंतर्भाव सदर निर्णयात करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बांधकामे करण्यासाठी विकास नियंत्रण अधिनियम आणि सागरी किनारा नियंत्रण क्षेत्र (सीआरझेड)डडयाचा अभ्यास करण्यासाठी शासनाने राज्याच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास,स उक्त समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत व सदर शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. प्रकाश मेहता : (१)१ ते (६) बृहन्मुंबईतील केंद्र शासनाच्या मालकीच्या मिठागराच्या जमिनी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी व परवडणा-या घरांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्यासाठी राज्य शासनाकडे वर्ग करण्याबाबत महाराष्ट्र शासनातर्फे वेळोवळी विविध स्तरावर केंद्र शासनाबरोबर पत्रव्यवहार व पाठपुरावा करण्यात आला आहे. मिठागराच्या जमिनीसंदर्भातत शासन निर्णय महसूल व वन विभाग, दिनांक २४.७.२०१५ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांना समन्वय अधिकरी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच मिठागर जमिनीच्या विकासासंदर्भात शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २१.८.२०१५ अन्वये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चधिकार समिती गठीत करण्यात आलेली आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागर जमिनीचा समुचित वापर करण्याच्या दृष्टीने बृहत आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येणार आहे.` तथापि, याबाबत केंद्र शासनाचा निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही.

---

u

मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा वाढविण्याबाबत

u

(७९) * u२८८४१ uuॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.रणजित कांबळे (देवळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) I: I सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दहावी पर्यंत शिक्षण मिळावे याकरीता सात वर्षांपूर्वी सुरु केलेल्या माध्यमिक शाळा सुविधा अभावी विद्यार्थ्यांविना ओस पडू लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांना सात वर्ष पूर्ण झाले असून या शाळांमध्ये मुख्याध्यापकच नेमण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच, या शाळांमध्ये स्वतंत्र शिपाई, कारकून, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक आदी कर्मचार्यांची पदेच भरण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील गरीब मुलांसाठी सुरु करण्यात आलेल्या या शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

uuuu तथापि, या शाळेतील सेवाज्येष्ठ शिक्षकास मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.

uuuu या माध्यमिक शाळांमधून मुख्याध्यापक संवर्गातील पदे माध्यमनिहाय सेवाज्येष्ठता यादीनुसार भरणेबाबतच्या प्रस्तावाबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

uuuu सदर शाळा प्राथमिक शाळांमधील शिपाई वर्ग आणि क्रीस्टल संस्थेमार्फत नेमण्यात आलेल्या प्रतिनिधीमार्फत स्वच्छ करण्यात येतात. खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधून अतिरिक्त झालेल्या लिपिक कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या विनाअनुदानित माध्यमिक शाळांमध्ये प्रशासकीय कामकाजाच्या सोयीकरिता तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी करण्यात आले आहे. ग्रंथालयाकरिता संदर्भ पुस्तकांची खरेदी करण्यात येणार असून आवश्यकतेनुसार ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहायक ही पदे महानगरपालिकेमार्फत भरण्यात येतील.

(४) शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत २७ शैक्षणिक वस्तु

पुरवठा, पूरक आहार, व्हर्च्युअल क्लास रुम प्रकल्प (इ. ५ वी ते १० वी), टॅब वितरण, मार्गदर्शक शिबीर, आंतरशालेय स्पर्धा, तीन विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये (महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना विनाशुल्क प्रवेश) आणि माध्यमिक शालांत परीक्षा अधिकतम निकाल देणाऱ्या शाळांना व विद्यार्थ्यांना रोख स्वरुपात बक्षिस योजना यासारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u
u

विधान भवन : u **डॉ. अनंत कळसे**
नागपूर. u **प्रधान सचिव**
महाराष्ट्रविधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.